म. ग्रं. सं. ठाणे
काव्य
२२०५
१९९२३

...ात्रीं । सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥ —एकनाथ.

# ...न-रत्न-माला.

पुस्तक ... तिसरें.



... ग्रंथ संग्रहालय ... ठाणे

**मंदारमाला.**

अत्यादरें लोक-कल्याण व्हाया जिला ठेविलें त्र्यंबकानें शिरीं
तीरीं जिच्या संत झाले, तयांचा अपूर्णांक तो अन्य देशांतरीं
श्री शारदेच्या महाराष्ट्र-पुत्रां सदा खेळवी जी निजांकावरी
... तपें जी असे तीच ही माय गोदावरी!

REFBK-0002331

संग्राहक व प्रकाशक
... सराफ, नांदेड (निजामस्टेट)

शक १८४८.] [ किं. आठ आणे.

Bhujanga Ramrao Ambekar P. Godavari P. P. Nanded.

# नारदाची गादी.

2331

मालेच्या दुसऱ्या पुस्तकाच्या आरंभीं उल्लेख केल्या प्रमाणें या पुस्तकांत कांहीं अभिप्राय दिले आहेत, ते आश्रयदात्यांनीं अवश्य वाचून पहावेत; ह्मणजे ईश्वराच्या आशीर्वादानें व जनता जनार्दनाच्या प्रेमळ व सहानुभूतीपर साह्यानें आरंभिलेल्या वाङ्मय सेवेचें विद्वानांकडून कसें कौतुक होत आहे, हें सहज लक्षांत येईल.

या पुस्तकांत वाचकांना एका नवीन कवीचा परिचय करून दिला जात आहे. रा. त्र्यंबकराव यांनीं आपलें काव्य पाठविलें व यापुढेहि पाठविण्याचें आश्वासन दिलें त्याबद्दल त्यांचे आम्हीं आभारी आहों.

दुसऱ्या पुस्तकांत सुचविल्या प्रमाणें कांहीं ग्राहक दीड रुपया म. आ. नें पाठवीत आहेत व कित्येक व्ही. पी. स्वीकारण्याचें कबूल करीत आहेत. बाकीच्या ग्राहकांकडे पाउणपट किंमतींत व्ही. पी. नें पुस्तक रवाना केलें जाईल. ट. ख. निराळा पडतोच.

आख्यानांचीं पानें निरनिराळीं देण्यास सुरवात केली आहे, परंतु प्रस्तुत पुस्तक त्या पूर्वींच अर्धें अधिक तयार झालें होतें, त्यामुळें तशी व्यवस्था यांतमात्र आढळून येणार नाहीं. पुढें दुसऱ्या पुस्तका प्रमाणेंच व्यवस्था राहील.

या पुस्तकांत ठरावापेक्षां पानें ज्यास्त आहेत तीं पुढील पुस्तकांत कमी येतील.

श्री गोदातीरच्या जनाबाईचें चरित्र 'गोदावरी' प्रेसमध्यें छापलें जावें, हा आमचा कृतसंकल्प सहानुभूतीनें शेवटास नेल्याबद्दल प्रेसच्या मालकाचे आम्हीं आभारी आहों.

नांदेड.
मकर संक्रमण १८४५.

सर्वांचा नम्र,
**गणेश अनंत सराफ.**

# अर्पण.



श्लोक (मंदाक्रांता)

आर्ये! माला बुधजनिं तुला अर्पिल्या शारदेला
त्यांची संख्या अमित परि त्यां त्वां दिलें मान्यतेला
तैसा माझा जननि! लघुसा यत्न हा मान्य व्हावा
सत्कार्यी या निज पद-रता त्वां यशोलाभ द्यावा

---

## अनुक्रमणिका.


१ नारदाचि दी (प्रकाशकाचे हृद्गत.) १
२ पाहुण्यांचा परामर्श (पांच व अभिप्राय.) २
३ मंगलाचरण (संतकवि दासगणू.) ३
४ कविपरिचय. ४
५ धर्म-द्रोह-दंड (कवि श्री. कृष्णाजी गोविंद ताम्हनकर-नागपूर.) १-१२
६ संतजनाबाई (संतकवि-दासगणू.) १२-२८
७ लवकुश (कविवर्य चूडामणि-कृत.) २८-४०
८ सेतु-बंधन (कवि. श्री. त्र्यंबक यादवराव देशपांडे वाळेकर-खांडवा.) ४०-४८
९ मालेवरील अभिप्राय. १-६

2317

# नारदाची गादी.

मालेच्या दुसऱ्या पुस्तकाच्या आरंभीं उल्लेख केल्या प्रमाणें या पुस्तकांत कांहीं अभिप्राय दिले आहेत, ते आश्रयदात्यांनीं अवश्य वाचून पहावेत; ह्मणजे ईश्वराच्या आशीर्वादानें व जनता जनार्दनाच्या प्रेमळ व सहानुभूतीपर साह्यानें आरंभिलेल्या वाङ्मय सेवेचें विद्वानांकडून कसें कौतुक होत आहे, हें सहज लक्षांत येईल.

या पुस्तकांत वाचकांना एका नवीन कवीचा परिचय करून दिला जात आहे. रा. त्र्यंबकराव यांनीं आपलें काव्य पाठविलें व यापुढेहि पाठविण्याचें आश्वासन दिलें त्याबद्दल त्यांचे आम्हीं आभारी आहों.

दुसऱ्या पुस्तकांत सुचविल्या प्रमाणें कांहीं ग्राहक दीड रुपया म. आ. नें पाठवीत आहेत व कित्येक व्ही. पी. स्वीकारण्याचें कबूल करीत आहेत. बाकीच्या ग्राहकांकडे पाउणपट किंमतींत व्ही. पी. नें पुस्तक रवाना केलें जाईल. ट. ख. निराळा पडतोच.

आख्यानांचीं पानें निरनिराळीं देण्यास सुरवात केली आहे, परंतु प्रस्तुत पुस्तक त्या पूर्वींच अर्धें अधिक तयार झालें होतें, त्यामुळें तशी व्यवस्था यांतमात्र आढळून येणार नाहीं. पुढें दुसऱ्या पुस्तका प्रमाणेंच व्यवस्था राहील.

या पुस्तकांत ठरावापेक्षां पानें ज्यास्त आहेत तीं पुढील पुस्तकांत कमी येतील.

श्री गोदातीरच्या जनाबाईचें चरित्र ‘ गोदावरी ’ प्रेसमध्यें छापलें जावें, हा आमचा कृतसंकल्प सहानुभूतीनें शेवटास नेल्याबद्दल प्रेसच्या मालकाचे आम्हीं आभारी आहों.

| | |
|---|---|
| नांदेड. | सर्वांचा नम्र, |
| मकर संक्रमण १८४५. | **गणेश अनंत सराफ.** |

# पाहुण्यांचा परामर्ष.

( पोंच व अभिप्राय. )

[ नियतकालिकाप्रमाणें मालेंतून पोंच व अभिप्राय देण्याचा प्रघात नाहीं. तथापि आलल्या पाहुण्यांचा परामर्ष घेणें योग्य असल्यामुळें आम्हीं त्यांच्या इच्छेवरून तसें करीत आहों. प्र. ]

**सचित्र 'स्वराज्यगीतें' भाग २ रा व सचित्र 'भारतोद्धारमाला, पुष्प १लें,** हीं दोन पुस्तकें कवि श्री. कृष्णाजी गोविंद ताम्हनकर ( नागपूर ) यांचेकडून आलीं आहेत. ( १ ) यांत राष्ट्रीय भावनेनें प्रेरित अशा धार्मिक, सामाजिक व राजकीय विषयांवर निरनिराळ्या प्रासंगिक पद्यांचा संग्रह असून तो खरोखरच संग्राह्य झाला आहे.

( २ ) यांत, श्रीसमर्थलीला, मालोजीचें कर्तृत्व, श्रीशिवजन्म, श्रीशिवरायाची बाललीला स्वातंत्र्याचा शपथविधि, स्वातंत्र्यापक्रम, श्रीसद्गुरुमहिमा, श्रीगुरुभेट, स्वामीभक्त तानाजी, कल्याणविजय अशीं दहा ऐतिहासिक आख्यानें व लघुसमर्थचरित्र, स्फुटपद्यें इत्यादि विषय असून नागपूरचे दे. भ. विनायक विश्वनाथ केळकर यांची उत्कृष्ट प्रस्तावना आहे. ते आपल्या प्रस्तावनेंत लिहितात कीं, 'रा. ताम्हनकरांचें कविता करण्याचें सामर्थ्यहि दांडगें असून एका दिवसांत ४०० कविता त्यांनीं केल्या आहेत.' यावरून घटित काव्यरूपानें गुजारत करणाऱ्या कविभ्रमरांचा सध्या सु—काळ असला तरी महाकाव्य निर्माण करणाऱ्या कवींचा कांहीं दुष्काळ नाहीं असें दिसतें. असो. रा. ताम्हनकरांचीं आख्यानें मालेंतून येऊं लागल्यामुळें त्यांच्या काव्याची निराळी शिफारस करण्याचें कारणच नाहीं.

**कैवल्यवैभव** – ( प्रकाशक रघुनाथ हणमंत कोटणीस वकील कुरुंदवाड, पो. सांगली S. M. C. किं. १ रु. ) हें पद्यात्मक पुस्तक असून त्यांत संस्कृत, मराठी, कानडी, उर्दू ( हिंदी ) इ. भाषेंत असलेल्या कवितांचे दहा प्रकरणांत उतारे आहेत; यांत त्यांची स्वतःचीहि कांहीं कविता आहे. हे उतारे संग्राह्य असल्यामुळें भाविक गुरुभक्तांना हें पुस्तक उपयुक्त आहे.

**नित्यपाठ पंचाष्टक व नित्यपाठ रामायण**–हीं दोन पुस्तकें रा. त्र्यंबकराव देशपांडे वाळेंवकर ( खांडवा ) यांचेकडून आलीं आहेत. पहिल्यांतील एक अष्टक समर्थांचें असून बाकीचीं चार अष्टकें त्यांचीं स्वतःचीं आहेत. दुसरें, नित्य पाठास उपयोगी असें २२७ ओव्यांचें संक्षिप्त रामचरित्र आहे. या दोन्हीं छोट्याशा पुस्तकांवरून कवींची दृढतर रामोपासना व्यक्त होते.

**भारत रोजनिशी व कॅलेंडर**–प्रकाशक विष्णू. बी. भगत शिरूरकर ( पुणें ) अपरिहार्य अडचणींतहि कर्तव्य म्हणून केलेल्या कामाबद्दल सहानुभूतीनें कोण पाहणार नाहीं.?

भेटीचा योग आणून दिल्याबद्दल आम्ही वरील सर्वांचे आभारी आहों.

मराठी ... संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2339
ठाणे

# आख्यान-रत्न-माला.

REFBK-0002331
REFBK-0002331

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ...
ठाणे.

## मंगलाचरण.

संतकवि–दासगणू.

पद ( चाल–शंभो शिवहर क० )

जय कमलावर दीनजनोद्धर भगवंता
भवभय हें हर जय० धृ०
भीमातट वासिया मुकुंदा !
आनंदकंदा ! जय गोविंदा !
हे शारङ्गधर ! जय० ॥ १ ॥
ठेवुनियां समचरण विटेवरि
हात कटीवरि नित्य मुरारी
भो ! अघमलहर ! जय० ॥ २ ॥
दासगणू तव आस करी
नित भावें तुजप्रति शरणागत
जोडुनि द्वयकर जय० ॥ ३ ॥

# धर्म-द्रोह-दंड.

'भारतोद्धार माला' कर्ते

## श्री. कृष्णाजी गोविंद ताम्हनकर

विरचित.

॥ येयथामांप्रपद्यन्ते तांस्तथैवभजाम्यहं ॥ — गीता.

१ पद [चाल-उद्धवा शांतवन.]

आयका आर्यबंधूनों ! पितृ-भक्त-चरित शिवबाचें धृ०
दावील मार्ग निर्धारें जे मानव कर्तव्याचे
मनिं येतां आत्मश्रद्धा होईल साह्य देवाचें

चाल— प्रभु-साह्यें येइल शक्ति
सुचवील तुम्हां तो युक्ति
मग दूर न जीवन्मुक्ति
सार्थक्य होय जन्माचें
लोकत्रयिं गाजे कीर्ति गातील चरित जन तुमचें १

२ पद [चाल-नरजन्मा मधिं.]

राव शिवाजी[1] दरबारीं श्रीराम जसा शोभला
लक्ष्मण तानाजी कीं भला
मंत्रि तयाचा पंत[2], सुमंतहि भूवरि हा पातला
जनांला भास असा जाहला
श्री समर्थ[3] गुरु शिवरायाला वसिष्ठसा लाधला
घडोघडिं दावी पथ चांगला

---

१. श्रीशिवाजी. २. मोरोपंत प्रधान. ३. श्रीरामदास स्वामी.

# * कविपरिचय.

श्री. त्रिंबकराव यादवराव देशपांडे, वाळवेकर—या विद्यमान कवींचा जन्म शके १७८३ च्या भाद्रपद वद्य ३ स रविवारीं माळव्यांतील वडनगर येथें एका गरीब पण कुलीन घराण्यांत झाला. यांची कुल परंपरा यांच्याच शब्दांनीं देतों:—**ओव्या—परम पवित्र श्री कृष्णातीर। वाळवे ग्रामींचे वतनदार। देशपांडे कुल थोर। सदाचारें नांदतसे ॥ ३१ ॥ गोविंद माझा प्रपितामह। शिवाजी असे पितामह। तयाचे पोटीं यादवराव। पिता माझा निर्धारें ॥ ३२ ॥ आश्वलायन सूत्र। भारद्वाज असे गोत्र। शाकल शाखा पवित्र। वंश निर्मल असे कीं ॥ ३३ ॥ त्याच ग्रामीं ग्रामोपाध्याय। कुल आमचे कुलोपाध्याय। विष्णुशर्मा विद्वद्वर्य। मातामह असे कीं ॥ ३४ ॥ यादव नामें माझा पिता। दुर्गा नामें माझी माता** ······ ··॥ ३५ ॥ श्री प्रल्हाद चरित्रामृत अ. १० वा.

बालपणींच मातापितरांच्या वियोगाचें दुःख भोगून, निराश्रितपणें खांडव्यास येऊन बाविसाव्या वर्षापर्यंत इंग्रजी पांच इयत्तांचें शिक्षण संपादन केलें. पुढें ' सुबोध सिंधु ' नांवाच्या तेथील छापखान्यांत प्रवेश करून त्याच नांवाच्या पत्राच्या संपादकाचें काम स्वतंत्र रीतीनें व बाणेदारपणानें सतत दोन तपें केलें. त्या नंतर, पत्नीवियोगामुळें तो संबंध सुटून लहान अपत्यांच्या संगोपनाचा भार ईश्वरावर ठेवून आतांपर्यंत प्रभुचिंतनांत खांडव्यासच कालक्रमणा चालत आहे. यांच्या एका बालमित्रानें ' **श्रीशंकर विजय बोध** ' नांवाचा आद्य शंकराचार्यांच्या चरित्रपर १०१ अ. चा १०००० ओव्यांचा एक ग्रंथ केला होता. त्याचा कच्चा खर्डा अत्यंत अव्यवस्थित असा यांना उपलब्ध झाल्यावर यांनीं त्याचें पुनरुज्जीवन केलें. तो ग्रंथ श्री. शंकराचार्य करवीर ( डॉ. कुर्तकोटी ) यांनीं संस्थानातर्फे प्रसिद्ध करण्याकरितां ठेवून घेतला आहे. त्या शिवाय ' नित्यपाठरामायण ' ( ओ. २२७ प्रसिद्ध ) ' श्रीकृष्णजन्माध्याय ' व पूर्वोक्त ' श्री प्र. च. अ. १० असें एकंदर चार ग्रंथ केले आहेत. विशेषतः कीर्तनपर अशीं ७।८ आख्यानेंहि तयार केलीं असून तीं त्यांनीं मालेकरितां देण्याचेंहि आश्वासन दिलें आहे. त्यांच्या कवितेच्या मुळाशीं जें भाविक अंतःकरण आहे, तें ईश्वरी प्रसादाचें चिन्ह आहे, असें त्यांच्याच पुढील उद्गारांवरून दिसून येईल :—**स्वप्नीं प्रगटोन कर्पूरगौर। मस्तकीं ठेवावया उचली कर॥ परि माझें कर्म दुस्तर। हात वरच्यावरी राहिला॥ ५ ॥ परी शब्द आठवती मला। वाचावया शिवलीला[1] ॥ ' कल्याणप्रद होईल तुला '। म्हणूनि बोलला दयाळ** ॥ ६ ॥ प्र. च. अ. २ रा.

---

* कवीकडून आलेल्या माहितीवरून. १ श्रीधर कृत शिवलीलामृत.

# धर्म-द्रोह-दंड.

'भारतोद्धार माला' कर्ते

श्री. कृष्णाजी गोविंद ताम्हनकर

विरचित.

॥ येयथामांप्रपद्यन्ते तांस्तथैवभजाम्यहं ॥ — गीता.

१ पद [चाल—उद्धवा शांतवन.]

आयका आर्यबंधूनों ! पितृ-भक्त-चरित शिवबाचें धृ०
दावील मार्ग निर्धारें जे मानव कर्तव्याचें
मनिं येतां आत्मश्रद्धा होईल साह्य देवाचें
चाल— प्रभु-साह्यें येइल शक्ति
सुचवील तुम्हां तो युक्ति
मग दूर न जीवन्मुक्ति
सार्थक्य होय जन्माचें
लोकत्रयिं गाजे कीर्ति गातील चरित जन तुमचें १

२ पद [चाल—नरजन्मा मधिं.]

राव शिवाजी[1] दरबारीं श्रीराम जसा शोभला
लक्ष्मण तानाजी कीं भला
मंत्रि तयाचा पंत[2], सुमंतहि भूवरि हा पातला
जनांला भास असा जाहला
श्री समर्थ[3] गुरु शिवरायाला वसिष्ठसा लाधला
घडोघडिं दावी पथ चांगला

---

१. श्रीशिवाजी. २. मोरोपंत प्रधान. ३. श्रीरामदास स्वामी.

चाल— हा राव रघूजी, अंजनिचा बालक[2]
हा अंगद, बाजी चकवी रिपु देशमुख[4]
ते शूर मावळे रामाचे सैनिक[3]
श्रीरामाचें राज्य होय कीं भास जनां जाहला
सुखाचा काळ जवळ पातला १

एके दिवशीं, असा दरबार थाटला असतां,

३ पद [चाल—नाहीं सुभद्रा.]

'तात शहाजी मुक्त जाहला' सुखवार्ता आली
माय भवानी श्री जगदंबा सुप्रसन्न झाली धृ०
सत्कार्याचें फळ हें, ऐसा अनुभव तैं आला
जीजाईच्या[5] सद्वचनाचा प्रत्यय शिवबाला
धर्मरक्षणीं तैं शिवजीला वीरश्री चढली तात० १
'स्वराज्य—कार्यत्यागें' रिपु तो प्रमुदित मनिं होतां
फशीं पडुनि अनुयायीगण मम कष्टी बहु होता
भोंसल—कुल—सत्कीर्ति कलंकित तैं असती झाली २

शिवाजी (भवानीस):— ४ पद [चाल-पंचतुंड नर.]

श्री जगदंबे माय भवानी! होउं कसा तव उतराई?
करुनि मुक्त जनकास, दाविली अद्भुत माया मज आई! धृ०
सुबुद्धि समयीं[6] देउनि मातें लाज राखिली त्वां माझी
रणगाजी ते ममानुयायी[7] सहज राहिले मज राजी
स्फूर्ति अशी दे समयीं समयीं त्वद्भक्तालागीं पाहीं श्री० १

बापाला त्रास देणाऱ्यांचा सूड घेण्याकरितां विचार करीत असतां शिवाजी म्हणतोः--

५ आर्या [गीति.]

'दंडूं काय शहाला' बोले, 'रिपु--नगरिं आज जाऊन'?
इतुक्यांत एक आला 'ताताचा[1] दूत पत्र घेऊन

---

१ शहाजीचा. २. मारुती. ३. रावण. ४. वानर. ५. शिवाजीची आई. ६. वेळेवर. ७ मला अनुसरणारे.

पत्राचा सारांश:--

### ६ झंपा.

अरे! घेइं तूं सत्वरीं सूड रिपुचा तरिच मत्पुत्र तूं असिसि साचा. धृ०
वाजि तो जणुं मूर्त नीच राक्षस खरा घात माझा तयें थोर केला
आर्य--कुलिं जन्मुनी धर्म अवमानुनी [1]वंचि मज दुष्ट तो शत्रु साचा १
कोंडि कारागृहीं, धाडि मज रिपु--गृहीं जाणुनी अवगणी त्वात्पित्याला
पुत्र माझा जरी, जाउनी सत्वरीं प्राण घेईं वळें शिवजि! त्याचा २

### ७ ओवी.

पाहतां पित्याचें पत्रलेखन राव मनीं कोपला [2]दारुण
म्हणे घोरपड्याचा प्राण घेईन यत्नें करोनी

तानाजी ( शिवाजीस ):-

### ८ साकी.

घोरपड्याचा, हे शिवराया! क्षणांत घेऊं प्राण
आज्ञा द्यावी या दासाला सत्य वचन हें जाण
चिंता काशाला? जातों याक्षणिं युद्धाला

आंग्रे ( शिवाजीस ):-

### ९ पद [ राग-हिंडोल. झपताल. ]

राया! वि[3]नायास जें साध्य हो त्यास
सेना तरि कशास? आज्ञा मला द्या! १
त्या दुष्ट नीचास जातों वधायास
भीति नच दासास आज्ञा मला द्या! २
विश्वास-घातास, उचिताचि अविश्वास,
व्हावें रण कशास? आज्ञा मला द्या! ३
'श्रीकृष्ण वि[4]जयास, कथि याच न्यायास'
ऐसें वदे व्यास आज्ञा मला द्या! ४

---

१. ठकवी. २. भयंकर. ३. श्रमावांचून. ४. अर्जुनास.

मारापंत:— १० पद. [ चाल-विराटवदना. ]

कळवुनि वळवुनि सर्व मराठे एक करावे आधीं
हां हां म्हणतां जाइल तरि ही फंद फितुर-व्याधि ०
ठायीं ठायीं वीर मराठे रणपंडित असती
ऐक्य न त्यांचें, म्हणुनि परांचे आज्ञांकित होती १
स्वजन धूर्त कुणि धाडुनि वेगें मूढां बोधावें
प्रत्यय दाउनि आर्य-बलाचा अवघे वळवावें २
कोणीं इकडे एकाएकीं रिपु-बल मोडावें
शक्तियुक्तिनें हे शिवराया! स्वबल वाढवावें ३

हीं निरनिराळीं मतें ऐकून,

११-१२ ओव्या.

शिवाजी करी भवानी-स्मरण तटस्थ झाले सकल जन
'श्रीजगदंबेची आज्ञा प्रमाण' म्हणती 'आह्मां' सर्वहि
" स्वराज्य-कार्य चालवावें बल आपुलें वाढवावें
प्रभु-कार्यीं सावध रहावें संधि येईल अकस्मात"

१३ दिंडी.

मान्य शिवजीला वचन अंबिकेचें कार्य अंगीकृत चालविलें साचें
शत्रु केले बेजार ठायिंठायीं तदा सत्ता डळमळे बादशाही

१४ ओवी.

शहा मनीं करी विचार पराभूत होतात सरदार
आतां धाडावा आपुला वजीर शिवाजीतें जिंकावया

१५ साकी

श्रीरामावरि ससैन्य आला गर्वें जसा 'प्रसेन'
वजीर 'रुस्तुम' बादशहाचा येइ तसा धांवून
हतबल परि झाला भ्याला; रण सोडुनि गेला!

---

१. स्वतःचें सैन्य व सामर्थ्य. २. जिंकलेले-जित. ३. प्रधान. ४. राक्षस विशेष.

१६ ओवी.

'अवदुलकरीम' नामा यवन     तसाच दुसरा बेलोलखान
विजापुरचे उभय प्रधान     श्री शिवरायें पिटाळिले

काव्य ७०८

१७-१८ दिंड्या.

तदा बादशहा खिन्न मनीं झाला     'शत्रु नाटोपे काय करूं याला
स्वयें जावें कीं काय,' करि विचार     सज्ज केलें तैं सैन्य तें अपार

राम-हननां[1] दशकंठ जसा आला     तसा अखिलांना[2] भास तदा झाला
नारि म्हणती, 'हा मरो! दुष्ट नीच     देवि! जगदंबे! पुरवि हीच आस'

१९ ओवी.

शिवाजीच्या राज्यीं येउन     शहा कांहीं दुर्ग[3] घेई साधुन
पुढें वर्षाकाल[4] आला दारुण     कांहीं उपाय चालेना

२० पद [ चाल-साज्य नेस. ]

बादशहा घाबरला     दारुण संकटिं जैं सांपडला     धृ०
वर्षाकाल भयंकर आला
केंवि धरावें या शिवबाला
सोडुनि जावें जरि यत्नाला
घालिल अवचित[5] घाला     १
कर्नाटकिं तीं बंडें उठलीं
सेना माझी संकटिं पडली
दुर्दैवाची सीमा झाली
धाडूं तेथ कुणाला?
आवरि येथें कोण शिवाला?     कांहिं कळेना मजला     २

१. मारण्यास. २. सर्वांना. ३. किल्ले. ४. पावसाळा. ५. एकाएकीं.

### २१ ओवी.

शहा बैसला चिंतातुर  तों तेथें आले वाडीकर
सावंत नामें योद्धे शूर  शहाप्रती विनविती

सावंत ( शहास ) :—  २२ आर्या [ गीति. ]

आम्ही गुलाम तुमचे झगडूं निःशंक रिपुशिं जोमानें
पाळूं वचन इमानें दावूं तरि वदन आपणां मानें[1]

„ „  २३ पद [ चाल-नरजन्मामधिं. ]

किंचित् द्यावें सहाय्य आम्हां कार्य करूं आपुलें
क्षणार्धीं बांधुनि आणूं मुलें  धृ०
'हिंदू' आम्ही धर्माचे परि दास खरे तूमचे
करूं अम्हि इच्छित निजस्वामिचे
राव शिवाजी बलाबल न जाणतां उगा बडबडे
अम्हांला पाहुनि निश्चित दडे
चाल—मिळविलीं किती जरि पोरें या शिवजिनें
करि चळवळ मोठी, 'घेइन नृप—पद' म्हणे
हा दवडिल परि स्वप्राण वृथा या पणें[2]
आजि उपेक्षा[3] करितां वाढे अहि—कुल[4] जणुं हें पुढें
विषाचें उपडावें रोपडें

### २४ ओवी.

शहा होता विवंचनेंत  म्हणुनी रुचली तया ही मात
बाजी घोरपडा शूर बहुत  दिधला साह्यार्थ बेलोला

नंतर तो शहा विजापुराला आला. इकडे,

१. अभिमानानें. २. प्रतिज्ञेनें. ३. दुर्लक्ष. ४. सर्पाचा वंश.

२५ ओवी.

आइती करिती तिघेजण मारूं म्हणती शहाजीनंदन
जैसे दीपावरी पतंग जाण उड्या घेती भक्षावया

हेर (शिवाजीस):— २६ साकी.

घोरपडा, बेलोल मिळाले वाडीकर, सावंता
त्रिदोषसम हे येति तुझ्यावरि, सावध हो! झणिं आतां
तीघां मिळुं नेदी दंडीं एकेकां जलदी

हें ऐकून शिवाजीला तालिकोटच्या प्रसंगाचें स्मरण होऊन तो सचिंतपणें मनांत:—

२७ दिंडी.

दुःख-हर्ता तो रामदास मातें जेविं चिंतामणि असे त्रिदोषातें
तोच मजला सन्मार्ग आज दावी तत्प्रसादें हें टळे व्यसन भावी

२८ ओवी.

'जयजयरघुवीर' शब्द उठला गुरुराणा अवचित आला
दरबारीजन आनंदला गुरुशिष्यांतें देखतां

समर्थ (शिवाजीस):— २९ आर्या [गीति]

भिववी तुझ्या मनाला प्रसंग हा तालिकोटसम म्हणुनी
परिहार व्यसनाचा करिं शिवबा! श्रेष्ठ युक्तिला वरुनी

,, ,, ३० पद [चाल-साध्य नसे मु.]

स्मरण तुला आहे ना! पितृवचनाचें हे शिवराया! धृ०
बाजे[1] मिळाला सावंतासी
वेलोलासह झुंजसि तुजसी
मिळुं नच देईं या त्रिकुटासी[2]
दंडीं एकेकांना १
तव जनकासी कपटें ठकवी

१. तयारी. २. संकट. ३. निघांस.

त्या बाजीला त्वद्गुल पटवीं
रक्तें त्याच्या ही भू नटवीं
पाठविं त्या यमसदना २
आर्य असोनी अरिस मिळाला
तव जनकाचा छल बहु केला
धर्म-द्रोही जाणुनि झाला-
योग्य असे हा मरणा ३

शिवाजी ( समर्थास ) :- ३१ आर्या [ गीति. ]

बाजी घोरपड्याचा घेइन मी प्राण आजि गुरुराया!
तवचि कृपें जनकाचें ऋण फेडाया झिजो तनय-काया

नंतर आईचा आशिर्वाद घेण्याकरितां तिला नमन करून म्हणतो:-

३२ पद [ चाल-सांब सुराभरणा. ]

तत्पर रिपु-हनना झालों दे आशर्विचना धृ०
क्षत्रियपति छळिला त्याचा काळ जवळि आला
दंडुनि त्यां रिपुनां आई! पाळिन पितृ--वचना
भारत-रिपु हे निवटुनि अवघे, सुखविन माते!मी आर्यांना १
माझा तानाजी, बाजी, सूर्याजी गाजी
करिति न हे 'जी!जी!' केवळ असती रणगाजी
संगें वीरांना घेउनि जातों घोर रणा
उत्सुक झालें मन्मन जननी! तारक माझा श्री गुरुराणा २

जीजादेवी:- ३३ पद [ चाल-उद्धवा शांतवन. ]

बालका! जाइं रणीं वेगें त्वत्तात-छलक संहारीं धृ०
हे बाळा! म्हणवुनि घेई भारतिं या तूं दुष्टारी

१. शत्रूस. २. या पुत्राचें शरीर. ३. शत्रूंचा वध. ४. शहाजी. ५. मृत्यु.

तद्भार्येचें अघ टाळाया        रिपु अवघे संग्रामिं मारी
चाल-        रिपु-भार्या त्वां न वधाव्या
            दुःशब्दें नच दुखवाव्या
            भगिनीसम त्या मानाव्या
                    तरि कीर्ति होय तव नेवरी
सद्धर्म होय सहकारी        त्वत्संकट निश्चित वारी        १

जीजादेवीः--

### ३४ आर्या [ गीति. ]

दुर्जन वधुनि मुला! ये अक्षत तूं सज्जनास सुखवाया
आशीर्वच हें माझें सत्य करो! सत्वरींच शिवजाया

### ३५ साकी.

देवि भवानी स्मरुनि निघाला रिपुवरि तो शिवराणा
अट्टाहासें मुधोळ नगरीं शिरला घेउनि सेना
पौर जनां भीति,        'आलें विघ्न काय' म्हणतां

### ३६ ओवी.

विद्युद्गतीनें अश्व फेंकित        नृप चालला सेनेसहित
घोरपड्याचें गृहास त्वरित        वेढा तयें घातला

### ३७ पद [ चाल जोडुनि कंथा सां. ]

द्वारीं रक्षक शिवरायाला आवेशें रोधूं म्हणती
सप् सप् कापी शिरकमलें शिव कृपाण घेउनियां हातीं        धृ०
पडती, झडती, भूवरती किति कलेवरांची नच गणती
नगरीं हाहाःकार उडाला नर-नारी-गण तळमळती        १
द्वारिं आपुले रक्षक ठेवुनि राव शिरे तैं प्रासादीं
रोधी, तो यम--सदना जाई, बाजीला शिवजी शोधी        २

---

१. त्याचें पुढचें. २. पाप. ३. युद्धांत ४. स्त्री. ५. साह्यकरणारा. ६. जखमेशिवाय. ७ भवानी. ८. आडवूं ९. तरवार. १०. प्रेतांची. ११. राजवाडा-घर.

पितृ--घातें संतप्त शिवाजी, वीरभद्र कीं हा आला
रिपु--सदनीं तो खड्ग चालवी, रक्त--पूर तैं वाहविला ३
घोरपड्याचे वंधु धांवुनी, शिवजी वरि करिती गरदी
विजयासम[1] शिव वीर उसळला, कंठ--नाळ छेदी जलदी ४
अत्यावेशें समर कराया धांवुनि जे जे रिपु आले
शिवरायाच्या कृपाण--घातें क्षणांत यमसदना गेले ५

३८-३९ आर्या [गीति]

समर भयंकर देखुनि घोरपडा बायकांत तो दडला
सांपडला शिववाला, व्याघ्र--मुखीं मेष[2] जेविं धडपडला
लत्ता--प्रहार केला कटिदेशीं, त्यासि पाडिला धरणीं
'धांवा! धांवा! मेलों!' शरणागत बाजि जाहला चरणीं

घोरपडे [शिवाजीस] :-- ४० पद [चाल-नच सुंदरि करूं.]

बेसावध मी असतां शस्त्र धरिसि मजवरती
उचित असे का राया! तुजला ही रीति धृ०
अवचित घालुनि घाला स्वजनां कां तूं छळिसी ?
करुनि कर्म अनुचित कां स्वकुल कलंकित करिसी ?
सत्पथ टाकुनि कां रे! निंद्य जनीं होसी ? १

शिवाजी [घोरपड्यास] :-- ४१ पद [चाल-मन भूल गुरुपद०]

न्याय नीतिचें तुज कां रे! स्मरण होय आतां ?
कोण नीतिनें त्वां छळिलें वद मदीय ताता ? धृ०
भोजनास बहु विश्वासें त्यास बोलवीलें
काय म्हणुनि मत्ताताला तुवां कोंडियेलें ?
स्वजन दुष्ट-हस्तीं देतां कुठे न्याय होता ? १

---

१. अर्जुनासारखा. २. मेंढा.

घोरपडे ( शिवाजीस ) :- ४२ पद [ चाल-नच सुंदरि करुं० ]

शस्त्र करीं घेऊं दे सोड मला शिवराया!
युद्ध करूं मग बरवें संमत जें न्याया धृ०
द्रोह करुनि स्वजनांसी विन्मुख होसी विजया
बांधव वधुनी कैसा दंडिसि यवनां वळियां?
सोडुनि दे मज आतां शिणवुं नको काया १

शिवाजी ( घोरपड्यास ):- ४३ पद [ चाल-मन् भूल गुरुपद० ]

न्याय, नीति मज शिकवीसी काय कुलकलंका!
आर्य बंधु छलुनी रिपुंना साह्य होसि धूका!
ज्ञातिबंधु तुजरूम कपटी केंवि विश्वसावें?
आर्य-भूमि-शत्रू जे, त्यां कां न मीं वधावें?
अंतसमयिं हरिला स्मरुनी जाई स्वर्गलोका! १

पतीचा वध होत हें पाहून घोरपड्याची स्त्री शिवाजीला म्हणतेः-

४४ पद [ चाल-लहान तुम्हि व्हावें० ]

विनति शिवराया! शिवराया! तुजला देई चुडेदान मजला धृ०
भगिनि तुज शोभे, शोभे मी अबला सौभाग्यावरि कां हल्ला! १
कां रे! दुखवीसी, दुखावीसि भगिनीला नाहीं काय दया तुजला २
घोर अपराधी पति माझा असला तरि तूं क्षमा करीं याला ३
क्षमाच भूषण, भूषण वीरांना नको रे! पेटूं अभिमाना ४
सोड पति माझा, माझा हा प्राण भगिनिस देईं चुडेदान ५

घो. स्त्री. ( शिवाजीस. ):- ४५ आर्या [ गीति. ]

शरणागतास मरण न द्यावें ही आर्य-नीति मानावी
राया! जगत्रयीं तव सत्कीर्ति जनीं अखंड वानावी

४६ दिंडी.

धर्मनीतिज्ञांसवें धर्म, नीति हीच सुजनांची जगीं असे रीति
दया दुष्टांशीं होय नित्य वायां अमा त्यग्म गे! येतसे जगा या

४७ ओवी.

रायें यापरि बोलून त्वरें सरसाविला भव्य कृपाण
घोरपड्यांचा[1] कंठ छेदून ऋण फेडिलें ताताचें

४८ आर्या [ गीति. ]

हलकल्लोळ उडाला, केला आक्रोश थोर ललनांहीं
उरले रिपु नत होती, 'बल आम्हां' म्हणति, 'यापुढें नाहीं'

उरलेले रिपुः–

४९ पद [ मालकंस. ]

शत्रूवरी मात[2] करुनी धरी हात
'विजयाश्रिचा कांत[3]' म्हणवी शिवाजी ध्रृ०
धन्या तुझी माय धन्य तो तव काय[4]
अन्याय–शिरिं पाय देसी शिवाजी! १
वारूनियां त्रास देसी विनायास
स्वातंत्र्य आम्हांस राया! शिवाजी! २
आलों पदीं शरण देऊं नको मरण
सोडूं न तों चरण राया! शिवाजी! ३

बाजीच्या मुलास जहागीर देऊन तेथून

५०–५१ ओव्या.

ससैन्य निघाला शहाजीनंदन सावंत वधूंस केलें शासन
हतबल केला बेलोलखान शहा झाला हताश
'स्ववीर–गण, निर्बल बनला रिपु मराठा बळी[6] झाला
'काय करावें' म्हणे ' याला वरी गत[7] दिसेना ! '

५२ आर्या [ गीति. ]

वागुनि जशास तैसें बाळियादा शत्रु नमवि घोर रणीं
त्या श्री शिवरायाच्या, सद्भावें नित्य नमन करूं चरणीं

**संपूर्ण.**

---

१ घोरपड्याच्या स्त्रियांनीं. २ बुद्धि कौशल्यानें जिंकणें. ३ पति. ४ शरीर. ५ समुदाय. ६ बलाढ्य. ७ दशा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 2339

# श्री संत जनाबाई

संतकवि दासगणु

विरचित.

१ आर्या [गीति]

गंगाखेडा माजी पुनीतशा गौतमी–तटा झाली
भगवद्भक्त जनी ती, ख्याति जिनें या जगत्रयीं केली

'सुखालागीं करिसी तळमळ' हा श्रीसंत नामदेवाचा अभंग एका कीर्तनांत ऐकून, जनाबाईनें आईबापाजवळ पंढरीस जाण्याचा आग्रह धरिला; व त्या प्रमाणें,

२ दिंडी.

जनकजननींसह जनी पंढरीसी निघे यात्रे वंदण्या विठोबासी
प्रखर झाला चंडांशु उन्हाळ्याचा तदा होता तो ज्येष्ठमास साचा

३ ओवी.

गरीबी ती अनावर पताक पित्याचें खांद्यावर
पडशी मातेच्या शिरावर टाळ हातीं जनीच्या

४ दिंडी.

पीठ पिवळ्याचें नित्य खावयासी
नसे वाहन एकही बसायासी
त्रिवर्गातें भूमीच पहुडण्याला
अशा थाटें चालले पंढरीला

५ पद [शारदे, दासकामदे]

ठेंगणी जनीची मूर्ति, दिसे कुरुप ती, नेसण्या प्रति, फाटकी फडकी

---

१. पवित्र. २. सूर्य. ३. प्रवास--साधन. ४. निजण्याला. ५. मुलीचें नेसावयाचें फडकें.

झिनकांठिं चोळि अंगांत असे बहु तुटकी
सांवळा जिचा तो वाण[1], नयन ते सान[2], आंखुडशि मान, शिरीं कचं[3] उडती
ना तेल म्हणुनि गान्हाणीं जणुं का करिती
ना पदीं घालण्या वहाण, काकणें लहान, करीं तीं छान, काळिं खुळखुळती
निज बंधु टाळ जो साथ तयाची करिती
चटचटा पोळती पाय, तापला काय[4], उन्हानें हाय! मार्ग आक्रमितां
**गणुदास** म्हणे ही कठिण किती निर्धनता

६ आर्या [गीति]

शिवगण दापिति सूर्या प्रेरुं नको प्रखरशा स्वकिरणांतें
कारण आनंदानें आजोळीं[5] गौतमी–सुता जाते

७ ओवी.

ऐसें ऐकतां तद्भाषण। बोलला सवितृं[6]नारायण
मातें अवघे नेत्र उघडून। पाहूंद्या गौतमी–कन्येतें

८ पद [हटातटानें पटा०]

वायु, वरुण, त्र्ययचरण[8], धनाधिप[9], इंद्रायणिचा पती
जनीला पाहुनियां बोलती ध्रु०
'निज कन्येला जनक–गृहासी धाडित पंढरपुरीं
गंगा गौतमि गोदावरी'
चालः– ऐकून असें तो बृहस्पती बोलला
'हें नव्हें सत्य हो! असें वाटतें मला
सद्भक्त नामदेवानें जो बांधिला
भक्ति–हर्म्य[10]; ही जनी नव्हे, जणुं निशाण त्याच्यावरी–
लावण्या धाडित गोदावरी' १

---

१. रंग. २. लहान. ३. केस. ४. शरीर. ५. प्रभूच्या पायापासून गोदावरी निघाली, म्हणून पंढरपूर हें आजोळ. ६. जनाबाई. ७. सूर्य. ८. अग्नि. ९. कुबेर. १०. राजवाडा.

 

९ ओवी.

चंद्रभागा अवलोकितां जनी हर्षली त्त्वितां
घातलें तिनें दंडवता शिखर दृष्टि पडतांच

१० दिंडी.

चिखल झाला पंथांत पंढरींत
वर्ष तोवरि पर्जन्य अतोनात
मेघपटलांनीं सूर्य लोपवीला
जसे दुर्जन झांकिती सज्जनाला

११ आर्या [गीति]

वस्त्रें अवघीं भिजलीं हुडहुडि भरली तदा त्रिवर्गाला
धनहीनता पदरिं त्यां, देति न जागा कुणी उतरण्याला

१२ ओवी.

न्यग्रोधाच्या[1] तळवटीं जाऊन उतरलें शेवटीं
त्या चंद्रभागेच्या कांठीं जनीचे ते मायबाप

गांवांत एकाएकीं वाख्याची साथ सुरू झाली.

१३ आर्या.

जननीजनक जनीचे झाले हैराण फार वाख्यांनीं[2]
मुळ मुळ जनी रडे तैं दुर्धरसा तो प्रसंग पाहोनी

१४ दिंडी.

उभयतांचे तैं प्राण निघुनि गेले
अल्पवयि त्या जनिला न कळुनि आलें
शवांलागीं[3] जाऊन मिठी मारी
मुखावरचे जननिच्या केस वारी

---

१. वडाच्या. २. महामारी. ३. प्रेताला.

बिनकांठिं चोळि अंगांत असे बहु तुटकी
सांवळा जिचा तो वाण, नयन ते सान, आंखुडशि मान, शिरीं कचें उडती
ना तेल म्हणुनि गाऱ्हाणीं जणुं का करिती
ना पदीं घालण्या वहाण, काकणें लहान, करीं तीं छान, काळिं खुळखुळती
निज बंधु टाळ जो साथ तयाची करिती
चटचटा पोळती पाय, तापला काय, उन्हानें हाय! मार्ग आक्रमितां
**गणुदास** म्हणे ही कठिण किती निर्धनता

६ आर्या [गीति]

शिवगण दापिति सूर्या प्रेरूं नको प्रखरशा स्वकिरणांतें
कारण आनंदानें आजोळीं गौतमी–सुता जाते

७ ओवी.

ऐसें ऐकतां तद्भाषण. बोलला सवितृनारायण
मातें अवघे नेत्र उघडून पाहूंद्या गौतमी–कन्येतें

८ पद [हटातटानें पटा०]

वायु, वरुण, त्र्यचरण, धनाधिप, इंद्रायणिचा पती
जनीला पाहुनियां बोलती ध्रु०
'निज कन्येला जनक–गृहासी धाडित पंढरपुरीं
गंगा गौतमि गोदावरी'

चालः– ऐकून असें तो बृहस्पती बोलला
'हें नव्हें सत्य हो! असें वाटतें मला
सद्भक्त नामदेवानें जो बांधिला
भक्ति–हर्म्य; ही जनी नव्हे, जणुं निशाण त्याच्यावरी–
लावण्या धाडित गोदावरी' १

---

१. रंग. २. लहान. ३. केस. ४. शरीर. ५. प्रभूच्या पायापासून गोदावरी निघाली, म्हणून पंढरपूर हें आजोळ. ६. जनाबाई. ७. सूर्य. ८. अग्नि. ९. कुबेर. १०. राजवाडा.

जनीः—

### १५ ओव्या (जात्यावरील)

आइ! कां न मला बोलसी कां निष्ठुर माया अशी
हें तरण तुज घालित्यें घेईं पायां मी लागत्यें

### १६ आर्या. (गीति)

सुटली बाण शवासी, परि न जनी त्या क्षणैकही सोडी
वरचेवर कवटाळी, कुरवाळी सांवरूनि पासोडी

### १७ पद (नृपममता०)

द्विज–वेष घेउनी आला तिजपाशिं भिमातटवाला तत्क्षणीं
'तूं सांग कुणाची? पोरी! वद मला हकीकत सारी येधवां
चाल–हीं मढीं चवाळ्यावरी, कुणाची तरी' असें तिज वदला
करि साह्य देव गरिबाला हा कसा

### १८ आर्या (गीति)

यात्रेकरु आम्ही बा! आलों यात्रेस पंढरीमाजी
हीं आहेत उभयतां मातापितरें द्विजोत्तमा! माझीं

हें ऐकून देवानें उत्तर दिलें कीं, "जने! तुझे आईबाप तर देवाला प्रदक्षिणा घालीत असतांना आतांच मीं देवळांत पाहिले. वेडे! हीं कुठलीं तरी प्रेतें वाहत आलीं असतील; चल, मी तुला तुझे आईबाप दाखवितों." त्यानंतर, गरुडाला प्रेतांची व्यवस्था करावयास सांगून, देव जनाबाईला घेऊन देवळांत गेला. तेथें त्यानें आपल्या उदरांत तिला तिचे मायबाप दाखविले; व म्हटलें कीं, 'बाटतील तितक्या जन्माचे मायबाप पाहून घे.' आपल्या आईबापांना देवानें आपल्या पोटांत सांभाळून ठेवलें आहे, या समाधानानें, ती पोरकी जनी यापुढें देवाजवळ भजनानंदात काळ कंठीत असतां—

### १९ पद [चाल-हटातटानें.]

एकेदिवशीं नामयाच्या[3] दृष्टिस पडली जनी
पुसे तो, 'आलिस तूं कोठुनी?
अल्पवयीं परि शांतपणाचा मेरू तूं वाटसी

---

१. कांजी. २. लहान वोंगडीवर. ३. घरीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. १७

कुठे ते जन्मासि त्यांच्या कुळीं?

चालः– ऐकून तयाचे बोल जनी बोलिली
"मम मायबाप ही साच विठू माउली
ठेवुनी कटीवरि हात उभी राहिली
त्याविण मजला कुणी न आतां अवघा हा श्रीहरि
सारी भिस्त तयाच्या वरी" २

## २० दिंडी.

जनी उपवासें बहुत रोड झाली
नामदेवा तिज बघुनि दया आली
म्हणे, 'माझ्या गेहास चाल पोरी!'
अनाथाचे ते संत साह्यकारी

नामदेव जनाबाईला घरीं घेऊन आला. हें पाहून त्याची आई--गोणाबाई संतापली.

गोणाबाई ( नामदेवास ):– २१ पद [ दधि बेचन मैना. ]

नाम्या! ठोंब्या! वेडाच दिससी गला! धृ०
घरचीं उपाशीं निशिदिनिं मरती
मग आणिलें कां हिला? १
संतपणासी आगचि लागो!
व्यर्थ शिणविलें मला २

आपल्याकरितां नामदेवाला व्यर्थ शिव्या बसतात, हें जनाबाईला बरें वाटेना.

## २२ आर्या.

तापुं नको तूं माते! राहिन उच्छिष्ट सेवुनी तुमचे
परि संत नामदेवा अशुभ असें गे! नको वदूं वाचे

---

१. घरीं.

आपल्यामुळें नामदेवाला त्रास होऊं नये, म्हणून जनाबाईनें, नामदेवाच्या घरचीं दळणा–सारखीं कष्टाचीं कामें करावयाचीं, व पोटाला मिळेल तें खावयाचें, पण संताचा दुर्मिळ व पवित्र सहवास सोडावयाचा नाहीं; असा मनाचा निश्चय केला. नामदेवानें तिच्याकरितां एक लहान झोंपडी बांधून दिली, तींत ती राहत असे. त्यानंतर—

### २३ अभंग.

एके दिनीं हृषीकेशी आला नाम्याच्या गेहासी
नामा, राजा,[1] गोणाबाई स्थिर झालीं एकया ठायीं
प्रेम भातुकी भोजन करी तेव्हां नारायण
गणु म्हणे जनाबाई आस त्याची करूं पाही १

### २४ ओवी.

कवळ[2] घालिती एकमेकां, देव भक्तांच्या कौतुका
पाहण्याप्रति. जनी देखा द्वारानाजी तिष्ठली

देवभक्तांच्या प्रेमभोजनांतून आपण कां वगळले गेलों, हें तिला न समजून फार वाईट वाटलें.

जनाबाई (भगवंतास उद्देशून स्वगत):–२५ पद [ नृपममता रामा. ]

मी हीन दीन भगवंता! म्हणुनि का रमेच्या कांता या क्षणीं ध्रु०
वगळिलें[3] मला घननीळा! हे कमलनयन गोपाळा! यदुपते!
श्रीधरा! शामसुंदरा! नटानागरा! भक्तसुखकरा!
तुझ्या उष्ट्याची
दासीहि भुकेली साची विठ्ठला! १

देवाबरोबर आपण जेवीत असतांना दारांत जनाबाईचें टक लावून पहात बसणें गोणाबाईला खपेना. ती तिच्यावर फारच रागावलीः–

### २६ओव्या [ जात्यावरील. ]

उभी राही न मेल्ये! द्वारां घास लागेल शारङ्गधरा
बसुं नकोस टोंकित इथें जा लट्ठे! वाहिर जरा

---

१. नाम० ची बायको. २. घास. ३. सोडिलें.

२७ आर्या [गीति.]

फार बरें म्हणुनि जनी, जाउनि निज झोंपडीमधें निजली
परि ती गोष्ट विबुधहो! रुक्मिणिपति विठ्ठला नसे रुचली

जनाबाई दृष्टि आड होतांच देवानें हात आखडता घेतला, व जाण्याची घाई केली. सर्वांची कशी तरी समजूत घालून तो परमात्मा जनाबाईच्या झोंपडीकडे निघाला

२८ पद [तूं टाक.]

झोंपडी जनीची जाण वाटली छान
जरि वंश, गवत तिजवरी परि तिचा श्रीहरि करि बहु मान धृ०
अंथरली वाकळ आंत
ठिगळेंहि जिला अगणीत
वळवळति उवा अत्यंत
घपघपा येत जरि घाण परि ती करी शालुवरि ताण १

२९ आर्या [गीति.]

मंचक, गाद्या त्यागुनि हरि तेथें वाकळी वरी वसला
भगवद्भक्त जनीचे चहुंहातें पाय दाबिता झाला

३० ओवी.

जनीचे पाहून वदन अलावला घे नारायण
म्हणे 'भाग्य माझें धन्य धन्य! करीं आले पाय तुझे'

३१ आर्या [गीति.]

जागें करुनि जनीला प्रभु बोले 'मी बहूत उपवासी
कांहीं तरि द्यावें त्वां आणुनि खायास येधवां मजसी'

जनाबाई (देवास):— ३२ [लावणी.]

तुज काय देउं सांवळ्या! खावया तरी
मी दुबाळि वटिक नाम्याची जाणसि परी धृ०

---

१. वेळू. २. वरचढपणा.

उच्छिष्ट तुला घालणें, गोष्ट ना बरी
तूं जगन्नाथ, तुज देऊं कशी भाकरी?

चाल- नच अंत मदीय बघूंस सख्या भगवंता! श्रीकांता!
हीं मध्यरात्र उलटली, आण तूं आतां निजचित्ता
होईल तुझा [1]काकडा राउळांतरीं
जन आणितील नैवेद्यहि नानापरी

३३ श्लोक [पृथ्वी.]

'नको मुळिंच शर्करा मजसि दे तुझी भाकरी'
असें म्हणुनि टोपली उघडितो तिथें श्रीहरी
जनीस धरुनी बळें प्रभु तिच्यासवें जेवला
शिळें परि न त्यांतला कणहि एक तो ठेविला

नामदेवाच्या घरचें उच्छिष्ट, परंतु देवानें जनाबाईबरोबर खाल्लें. तिच्या बरोबर बोलत बसावेसें त्याला फार वाटूं लागलें. उत्तर रात्रीची वेळ. जनाबाईला दळणाची आठवण झाली; तेव्हां ती देवाला म्हणत्ये, 'देवा! तुझ्याशीं बोलत बसावयाला खरोखर मला मुळींच वेळ नाहीं. उजेडेपर्यंत दळण झालें पाहिजे. हें तिचें भाषण ऐकून, देव अंगावरचे दागिने उतरून:--

३४ आर्या [गीति.]

दळण दळिन तवसंगें, परि न तुझा विरह मजसि साहेल
वेळ असे थंडीची, घे पांघरण्या मदीय ही शाल

भक्तप्रिय परमात्मा, जनाबाई बरोबर दळूं लागला. त्यानें तिला गाणें म्हणावयास सांगितलें.

जनाबाई (दळतांना.):- ३५ [जात्यावरील.]

माझ्या भक्ति मळ्यामाजी भाव तुळशीच्या मंजिरा
प्रेमदोरा घेउनि करीं हार गुंफिन शारङ्गधरा
बाई [2]शयनी एकादशी आली यात्रा पंढरपुरा
बंधु माझा ज्ञानेश्वर शोभे वैष्णवांत हिरा

---

१. काकड आरति. २. आषाढी.

ग्रं संग्रहाल नं. २१ ता.

जनाबाई·

माझ्या निवृत्ति दादाला भाऊ आह्मी अलौकिक
प्रेम–पाशामधें बांधिला ज्यांनीं वैकुंठ–प्रापक
चांगा, चोखोबा, सांवता संत माळेचे जे मणी
करिं वंदन त्यांच्या पदा नामयाची वेडी जनी

जनाबाई (देवास) :– ३६ दिंडी.

फोड आले हस्तास तुझ्या देवा!
तुझी कोमल तनु खचित वासुदेवा!
आज दळिलें त्वां दळण येथ वारें!
जनीं कळतां होईल हंसें सारें

३७ ओवी.

प्रभातींचा चौघडा वाजूं लागला धडधडा
तें ऐकून कानकोंडा झाला विठ्ठल मानसीं

३८ साकी

लगबगिनें ती वाकळ घेउनि जनिची अंगावरती
राउळिं तो श्री विठ्ठल गेला; धन्य जनीची भक्ति!

३९ ओवी.

पाहून विठूची वाकळ बडवे खवळले तात्काळ
म्हणती 'ऐसा कोण खळ दर्शना आला कळेना!'

देवाच्या अंगावर एकहि दागिना दिसेना. चोरीची वार्ता पसरली.

बडवे (आपसांत) :— ४० पद [तूं टाक चिरुनि.]

चोरिली विठूची शाल खचित कुणि काल
ना दिसत गळ्यांतिल गोफ तसा तो नव कलगीचा लाल धृ०
कंठा न दिसत मोत्यांचा
मोडला ठाव पोंचीचा

---

१. अपूर्व. २. मंदिरास. ३. पुजारी. ४. दुष्ट. ५. नवा. ६. तुरा. ७ पत्ता.

पत्ता न कडीं अंगठिचा
हा! हाय! जाहला घात     आमचा ऐन चोरिला माल     १

वडवे (आपसांत):— ४१ पद [कांचं करितां ल.]

उमगाया[1] चोर आतां     साधन ही गोधडी     धृ०
घेउनी चला ही करीं, चवाठ्यावरी, करणि ना बरी
वेळ ही थोडी सा० १
कुणि कुणी छाति ठोकिती, मृत्तिकाहि ती, मुखीं घालिती
वळली बोवडी सा० २

वडवे (आपसांत):— ४२ श्लोक [व. ति.]

ही गोधडी दिसतसे बहुधा जनीची
कैसी तिचीहि फिरली तरि बुद्धि साची
ती आपणा म्हणविते जगतांत 'संत'
आतां कळूनि चुकलें नच त्यांत अर्थ[3]

वडवे (जनीला):— ४३ श्लोक [भु. प्र. अथवा झंपा]

जने! नष्ट तूं दुष्ट चांडाळ साची
कशी चोरिली शाल ही विठ्ठलाची?
कुठे गोफ, कंठा, कडीं सांग आतां
तुला मारणें वाटतें योग्य लाथा

जनाबाई (वडव्यांना):— ४४ पद [अंकित म्हांत्र०]

केली मीं न विठूची चोरी     आळ नका घालूं मजवरी     धृ०
तोच होउनी येथें आला     शाम कन्हया हरि     १
शालु, दागिने बळेंच त्यानें     दिले मजसि निर्धारीं     २
वाकळ घेउनि पळून गेला     गणु म्हणे गिरिधारी     ३

---

१. भांडवल. २. ओळखण्याला. ३. खरेपणा.

४५ ओवी.

जरी जनीचे सत्य बोल परि ते अवघ्यां वाटले फोल
वडवे खवळले तात्काळ अद्वातद्वा बोलती

वडवे (जनाबाईला):— ४६ पद [चाल-हा मदंगा लावुं.]

तो दगड अचेतन निर्गुण निश्चळ सगुण कसा गे! होय हरि?
'गिरिवर येउनि सभेत वदला,' गोष्ट गणावी काय खरी? धृ०

चालः— 'वळेंच' म्हणसी 'सदनीं आला'
झांकुं नको गे! निज कृत्याला
संतपणा तो तुझा समजला
कौटाळिण तूं असमि पुरी, आला न घरीं, तव साच हरि
तूंच चोरटी भिमातिरीं जने! सगुण कसा गे! होय हरि? १

जनाबाई (वडव्यांना):- ४७ श्लोक [व. ति.]

मानूं नका दगड त्या मम विठ्ठलाला
तो भक्त वत्सल हरि प्रभु दूध प्याला!
शेले विणी निजकरें कबिराश्रमासी
येई हटीं विठु तयांस विकावयासी!

जनाबाई म्हणत्ये काय, इकडे कोणाचेंहि लक्ष नाहीं. वडव्यांनीं सरकारांत वर्दी देतांच, तिच्या जवळ देवाचे दागिने सांपडल्यामुळें राजानें तिला सुळावर चढविण्याची आज्ञा केली तेव्हां,

४८ आर्या [गीति.]

रक्त सुमनमालांनीं राजाज्ञेनें जनीस सजविलें
सिंदुर भालीं चर्चुनि सुळिं द्यायासी भिमातटीं नेलें

चोरी न करूनहि सुळावर चढविलें जात असतांना देखील राजासंबंधानें किंवा वडव्यांसंबंधानें तिची नम्र भावना बदलली नाहीं. उलट तिनें त्यांना विनंति केली कीं:—

४९ अभंग.

सुखें द्यावें मातें सुळीं त्याचें दुःख नाहीं मुळीं

---

१. पर्वत. २. कुटिल. ३. बाजारांत. ४. लाल फुलांच्या. ५. कपाळीं.

परि माझ्या शारङ्गधरा मानूं नका थोंडा, चिरा!
तो दयाळू भगवान बाप माझा नारायण
गणु म्हणे ऐशा रिती जनी बडव्यांना विनवी ती

आतां सुळावर चढावयाची वेळ. जनाबाईला नामदेवाची आठवण होऊन,

५० पद [ पांडु नृपति जनक. ]

जोडुनियां द्वयकरांस
जाय शरण नामयास
चरणाची धरुनि आस
म्हणत त्याप्रति १
कीं 'मदीय जन्म धन्य!
फळलें मम पूर्व पुण्य!
प्रभुसाठीं येत मरण!
आज निश्चिनीं २
नरतनु ही नाशवंत
होत तिचा आज अंत
भेटेल श्री अनंत
तो रमापती! ३

नामदेव तिचें समाधान करूं लागला. 'जने! निर्धास्त रहा. येथें तूं अनाथ आहेस असें पाहून लोक तुला गांजूं लागले आहेत. तथापि, तुझी सारी भिस्त ज्या पांडुरंगावर आहे, तो मुळींच तुझी उपेक्षा करणार नाहीं.' सुळावर चढण्यापूर्वीं तिनें पांडुरंगाचें स्मरण केलें.

५१ श्लोक [ शा. वि. ]

श्री भीमातटवासि! हे मुररिपो! नारायणा! राघवा!
विश्वेशा! विबुधप्रिया! सुखकरा! दामोदरा! माधवा!
श्रीकांता! गरुडध्वजा! नरहरे! कृष्णा! मुकुंदा! झणीं
पावावें मज विठ्ठला! विनविते दासी तुला ही जनी

'मजबरोबर तूं दळूं लागलास, हें कळतांच लोकांत तुझें हसें होईल'; असें जनाबाई, देवाला यापूर्वींच बोलून गेली होती. त्यामुळें देवहि 'आतां हसें कोणाचें होतें तें पाहूं' असें मनांत म्हणत

क्र. 2339

तिच्या हांकेला 'ओं' देईनासा झाला. आईबापांच्या पाठीवरीं त्याच्यावर सर्वस्वी भार टाकला, त्या पांडुरंगालाहि कां दया येऊंनये, हें तिला समजेना, देव म्हणजे तिचें प्रेमसर्वस्व! असें असूनहि तो लाज राखित नाहींसें पाहून ती त्याच्यावर रागावली. * साहजिकच आहे कीं आत्मनिवेदन भक्तीनें जेथें सर्वस्वार्पण करावयाचें तेथें रागावण्यालाहि अधिकार पोंचतो.

जनाबाई (त्रास):- ५२ ओंव्या [ जात्यावरील. ]

तूं मेल्या! कपटी खरा बळें आलास माझ्या घरा
गोडगोडशा देउनि थापा केला जन्माचा मातेरा
आग लागो तव भूषणां[1] मी थुंकेन त्यांच्यावरी
तूं जन्माचा चोरटा मज केलेंस आपुल्यापरी
बरें झालें कळलें आतां तव संगति नाहीं बरी
गणु म्हणे ऐशा रीतीं माय रुसली देवावरी

'**विठ्या! तुझें गेलें मढें। तुजसाठीं कोण रडे,**' असें ती देवाला उद्देशून म्हणते न म्हणते, तोंच सुळावर चढविण्याची घाई सुरू झाली. चंद्रभागेच्या वाळवंटांत तो प्रसंग पाहण्या करितां सारें पंढरपूर जमलें. जे ते तिच्या संबंधानें आपसांत बरें वाईट बोलूं लागले. परंतु, भक्तवत्सल परमात्म्यानें शेवट गोड केला.

५३ श्लोक [ पृथ्वी. ]

जनी चढवितां सुळीं, सुळ तिथें निमाला पहा!
रमारमण राघवा! कृति तुझी अगम्या[2] महा!
कदा न निज भक्त ते बुडविशी प्रभो! संकटीं
तुला नमन हें असो! तव निवास भीमातटीं

सुळाचें पाणी होतांच,

५४ दिंडी.

रक्तमाला तटतटा तुटुनि खालीं

---

* जनाबाईचा मूळअभंगः-**विठ्या! तुझें गेलें मढें। तुझ्यासाठीं कोण रडे,**

१ दागिने. २ दुर्बोध.

पतित झाल्या; श्रीकांत जिचा वाली
अखिल जन ते लागले तिच्या पायीं
'धन्य' म्हणतां 'तूं जगतिं जनाबाई!'

५५ श्लोक [ मालिनी. ]

जय जय जयकारें देव ते गर्जतात
थय थय थय तैशा अप्सरा नाचतात
वदनिं सुर जनीचे गुण वाखाणितात
हरि भजनिं जने! तूं ख्यात साऱ्या जगांत.

हें वर्तमान राजाच्या कानांवर जातांच, तो जनाबाईला अनन्यभावें शरण आला.

राजा ( जनाबाईस ):– ५६ पद [ रणधीरा श्रीवर. ]

अधम खरा मी नरपामर शरणागत चरणा धृ०
जन्ममरणा, करिं हरणा, हा भव दुस्तर, देउनियां कर
यांतुनि उद्धर मज दीना १
कृपा–करा, ठेवि शिरां, दे थारा,
गणु नत तव पदिं, मान्य करीं कवना २

५७ ओवी

साडी चोळी चंद्रहार घेउनि राजा करी आहेर
दक्षिणेसाठीं साचार ताट ठेविलें सोनांचें

जनाबाई ( राजास ):– ५८ पद [ रा. भिन्न. ता. दीपचंदी. ]

नको मज साडी नसें मी रे! उघडी
भक्तिची पैठणी नेसुनि बसल्यें राया!
भावें मन विटलें धृ०

---

१ सर्व.

ग्रंथ संग्रहा

वैराग्याची अंगांत चोळी
'केशव' 'राघव' नग हे मी ल्यालें १
मीपण जाळुनि काजळ केलें
ज्या योगें जग हरिरूपें दिसलें २
सद्भावाचें कुंकूं कपाळीं
गुरुरायानें मज लावियेलें ३
त्यां पुढती या तव भूपणांची
किंमत ना मज; गणुदास बोले ४

याप्रमाणें बोलून तिनें राजाला 'नामसंकीर्तनाचा ध्यास असूं दे, त्यांतच माझा संतोष आहे,' असें सांगितलें; आणि ती स्वतः हि भजनानंदांत निमग्न झाली.

५९ पद [ शाम कुनरिया. ]

कमल नयन गिरिधारी राम क०
बारबार नर तनु नच लाधे
जावो नच वायां सदय भो! कंसारि धृ०
कांठिं भिमेच्या वससि विटेवरि
ठेवुनियां निज हात कटीवरि
येवो दया गणुप्रत नित तारी क० १

जनाबाई भजनांत गुंतल्यामुळें नामदेवाच्या घरचें कामकाज त्या दिवशीं तसेंच राहूं लागलें. वेळेवर काम न झालें, तर गोणाबाईला कांहीं जनीची दया नाहीं येणार, हें जाणून,

६० आर्या [ गीति. ]

होइल वेळ जनीला, म्हणुनि प्रभु काननीं शेणी वेंची
तिज गुज गोष्टी सांगे, 'आस जने! मज तुझ्याच पायाची'

---

१ रानांत. २ गोंवऱ्या.

### ६१ ओंवी.

गोंवऱ्यांची भरूनि पाटी[1] निजशिरीं घे जगजेठी
जनाबाईच्या प्रेमासाठीं वेडा झाला विठ्ठल

जनाबाईचें किती कोडकौतुक करूं, असें देवाला झालें.

### ६२ श्लोक [शा. वि.]

न्हाऊं मी तुज घालितों, आजि जने! ये बैस पाटावरी
लावूं दे उटणीं त्वदीय तनुला, वाळा, हिना, कस्तुरी
पाणी या सतलांत मी विसणिलें आतां करी तांतडी
लावी आड सुखें मदीय करिच्या पीतांबराची घडी

### ६३ पद [चंद्रकांत राजाची.]

मौज पहाया ती न्हाण्याची संत सकल आले
अंतरिक्षीं[2] ते सुरगण मिळुनी गौरविते झाले
सभोंवतीं त्या दिव्य पताका, झपझपती झांजा
धन्य जने! तुज न्हाउं घालितो पंढरिचा राजा
'जय जय विठ्ठल' या जयघोषें अंबरें[3] तें भरलें
**दासगणु** म्हणे देव, भक्त हे एक रूप झालें

## संपूर्ण.

१ टोपलें. २ आकाशांत. ३ आकाश.

श्री.

# लवकुश–चरित्र.

(कविवर्य चूडामणिसुत विरचित.)

१ आर्या [गीति.]

श्रीरामक्रतु[1]वंगा संगातें शामकर्ण तुरगातें[2]—
घेउनि शत्रुघ्न निघे; यद्यश झाले रणीं चतुर गाते

यज्ञाचा घोडा पाहून कित्येक राजे आपोआप शरण आले. कित्येकानीं तो अडवून धरिला असतां युद्धांत पराभूत होऊन नंतर ते शरण आले; या प्रमाणें,

२ आर्या [गीति.]

यश संपादुनि आला साश्व[3] चमू सद्भूप[4] दाशरथी[5]
वाल्मीक्याश्रम पावे काय रघूत्तम–वधू–पदाश[6] रथीं

आश्रमाजवळ घोडा आला तेव्हां,

३ श्लोक [व. ति.]

गेला कुशार्थ[7] कुश[8] अंकुश दुर्मदेभा[9]
यज्ञा मुनी[10] बलिगृहा[11], शिशु–नर्म[12] दे भा[13]
जो बालकांत करि खेलन त्या लवानें[14]
वाचूनि पत्र तुरगा धरिलें लवानें

सर्व सेनेबरोबर लवानें युद्ध करून जेरीस आणलें, त्यावेळीं ती सेना शत्रुघ्नाला म्हणाली_

१. यज्ञसंबंधी. २. घोड्याला. ३. घोड्यासह. ४. सेनारूपी उत्तम स्वारांचें पालन करणारा. ५. शत्रुघ्न. ६. रामाची स्त्री सीता-तिच्या पायाची आशा करणारा. ७. दर्भा करितां. ८. सीतेचा वडील मुलगा. ९. दुरभिमानरूपी हत्तीला. १०. वाल्मिकि. ११. बलीच्या घरास. १२. मुलांची क्रीडा. १३. शोभा. १४. सीतेच्या लहान मुलानें.

४ पद [ता. दीपचंदी.]

मुनि बाळानें धरिला कीं वाजी झाली चिंताहि प्राप्त जीवाजी! ध्रु०
कटीं कौपीन[1], मस्तकीं टोपी एक लक्षा तो वीर नाटोपी १
कंद मूलाशी[2] वसतीला कोपी[3] कालरुद्राग्निसारिखा कोपी २
बहु सैन्याचें तोडिलें पाणी[4] आम्हीं प्राणांसी सोडिलें पाणी ३
तुम्हावांचूनि नावरे वाटे चूडामाणिजेशें लाविलें वाटे ४

५ पद [मेरे गरुडध्वज.]

ऐकतां ही अपजय–गोष्टी क्रोध न समाये हृदिं, ओष्ठीं ध्रु०
'बळानें म्यां जिंकिली सृष्टी' बाळका! कां होती कष्टी ?
आतां साहीं मम शर–वृष्टि' ओढिली मख–कार्मुक[5]–यष्टि
मातलें[6] समरांगण[7] भारी सखा दासाचा कैवारी १

६–७ आर्या [गीति.]

लघु[8] नंदन सीतेचा शत्रुघ्नासम न पावतां आजी[9]
वरि वरांग[10]–बलीनें[11] तम करी काय देवता–आजी[12]
यामार्ध[13] युद्ध केलें शत्रुघ्नें दुःसहासि[14] लव तोका
शर[15] राम–दत्त[16] सोडी, विंध्य[17] अगस्तीविनाच[18] लवतो का?

८ श्लोक [व. ति.]

झाला अचेतन शिशू रघु–मार्गणानें[19]
तो घातला मग रथीं पृतनागणानें[20]
अश्वारुहीत परते निज यज्ञ–गेहा
मातेसि तोकें[21] कथिती धरिला अगे! हा

---

१. लंगोटी. २. कंदमुळें खाणारा. ३. खोपी. ४. हात. ५. कमठा. ६. माजलें. ७. युद्धभूमी. ८. लहान मुलगा--लव. ९. लढाई. १०. मस्तक. ११. बळीदेण्यानें. १२. समुदाय. १३. अर्धप्रहर. १४. न आटोपणाऱ्या लव नांवाच्या मुलाबरोबर. १५. बाण. १६. रामानें दिलेला. १७. पर्वत विशेष. १८. ऋषि विशेष. १९. ( शत्रुघ्नाच्या सोडलेल्या ) रामाच्या बाणानें. २०. सेना समूहानें. २१. इतर मुलें.

सीता ( स्वगत ):— ९ पद [ ये रे गरुडावरि. ]

"बालक माझा लव तान्हा रण करी त्यासी, किति शाहणा धृ०
कंदफळें त्या वेळ नाहीं समरीं अरि जिंकिल काई?
थकले सुकले परदेशी निर्दय नेतो पर देशीं
नाहीं साही तरि आली पाडस गुंतुनि पडे जाळीं"
तो कुश आला मनिं कचला चूडामणिसुत अणिक चला १

कुश ( शत्रुघ्नास ):— पद १० [ चाल--सदर. ]

उभारे! चोरा! मज पाही आलों मी बंधूला साही
सोडितां घोडा लवलाही भाजितो सैन्याची लाही
जुनी विद्या आठवि कांहीं समर हा लवणासम नाहीं
आतां चिंती निज साहकारी सखा दासाचा०

कुश ( शत्रुघ्नास ):— ११ आर्या [ गीति. ]

लवणासम कुश नोहे, बुडविल तुजला नकोचि लव काळ
शर राम--दत्त सरला, होतें आतां मुखाब्ज तव काळ

१२ श्लोक

कोपाग्नि नोहे सहसाहि सोपा रोपा हणोनी उभवीत सोपा
तो लोळवी वीर असंख्य भोई काढीं असूतें जणुं मत्स्य भोई

कुश (शत्रुघ्नास):— १३ पद [ ता. दीपचंदी ]

आतां कोठें पळसी कां कां समरीं मळसी? धृ०
बालक पाहुनि वहुतीं धरिला कोठुनि त्याला वळसी? १
धैर्य धरोनी युद्ध करीं मज होई न किंचित आळसी २
चूडामणिसुत, निज बाणांच्या वाहतो सुमनें, तुळशी! २

---

१. शक्ति. २. शत्रु. ३. निराश्रित. ४. साह्य. ५. जोडीदार. ६. कचरला. ७. तात्काळ. ८. राक्षसविशेष. ९. वेळ. १०. काळें. ११. कदापि. १२. बाणाला. १३. ( बाणांचा )--ओघ रचीत. १४. भूमीवर. १५. प्राणाला. १६. कोळी. १७. ( यशानें ) मलीन होसी. १८ फुलें.

१४ श्लोक [ व. ति. ]

शत्रुघ्न तो भुजबळें सकला कुशाशीं
युद्धीं पुरी न पडला, थकला कुशाशीं
बंधू सचेतन करी, धरिला उराशीं
' मातेप्रती नर-शिरादिक दाउं राशी ! '

१५ आर्या [ गीति. ]

सेवक रामा कथिती; ' पाडुनि शत्रुघ्न ओढिला वीति '

सेवकांकडून शत्रुघ्नाचा अशी अवस्था झालेली ऐकून रामः—

' जा लक्ष्मणा! अतां तूं, रुद्वार रणासि ओढि लावीति

लक्ष्मण ( कुशलवांस ):— १६ पद [ चा ये रे गरुडा. ]

राखा जीवित जा परता युद्ध कशाचें वेद-रता ?
अविवेकासी अनुसरतां वालक! रागें कां मरतां ?
किति वळ मुनिच्या कुमरांचें कार्य हें कठिण समराचें
चूडामणिसुत, मनिं द्रवला अंतरीं लोभाचि उद्भवला १

कुश ( लक्ष्मणास ):— १७ पद [ ता. दीपचंदी. ]

कां रे सोडिली समराची वाणी आह्मां सांगसी ठोंवस वाणी ध्रु०
कानीं स्यां ऐकिली पृथुतर ख्याति पाहूं कीं चंचल पाणी १
नोहे कीं राक्षसी उपलांचा मारा झुंजावें लागेल बाणीं २
चूडामणिसुत, सकल वीरांतें धाडिलें दशदिशा रानीं ३

१८ आर्या [ गीति. ]

कुश आवेशें भरला संयीति सानुज सहस्रधा नाचे
एकया रोपें उडवी मस्तक सौमित्रिच्या प्रधानाचे

---

१. सर्व पृथ्वीला शासन करणाऱ्याशीं. २. पुरा. ३. लव. ४. कुश करी. ५. दाखवूं. ६. घोडा. ७. आढ. ८. जन्मस्वभाव. ९. अडाणीपणाच्या गोष्टी. १०. पुष्कळ. ११. हात. १२ दगडांचा. १३. बाणांनीं. १४. युद्धांत. १५. लक्ष्मणाच्या.

## १९ पद (चाल—धेरेगरुडावरी)

धांवला तंव लक्ष्मण कोपें — आसले ते बालक सोपे — ध्रु०
कुशानें हृदिं हणिला रोपें — वीर तो पडला, रथीं चोपे
बाळ हा काळा नाटोपे — ठायीं ठायीं सेना थोपे
राघवा श्रुत केलें चारीं — सखा दासाचा कैवारी — १

## २० श्लोक

आश्चर्य मानी रघुनाथ भारी — जंबूक झाला अजि का इभारी ?
कैचा मुनी हा फिरला जमाना! — यज्ञास हें विघ्नचि आज माना !

राम ( भरतादिकांस ):— २१ पद [ तर. दीपचंदी. ]

आतां जा वेगीं वीरेशा! — उडीं घालीरे — ध्रु०
कोण कुणाचे बालक समजा — बळें सीमा झालीरे — १
बाधा न करितां आकळा दोघे — पाहुं बलशालीरे — २
चूडामणिसुत, जीवन राखा — कोण आहे वालीरे? — ३

राम ( भरतादिकांस ):— २२ आर्या [ गीति. ]

लक्ष्मण शत्रुघ्ना व्हा रविचंद्रा तोक आडवी राहू[10]
राहूं उगा कसा मी, रक्ष[11] सुदर्शन तुं आड वीरा! हूं[12]

"

## २३ श्लोक [ व. ति. ]

आलें भिणें ज्वलनतुल्य[13]चि कीं धुरा[14] या
पूर्वी दशास्य—हनना[15]हुनि बंधुराया !
कोडें अनेकपरिचें मज भासताहे
जातां सुकीर्ति, मख—कर्म[16]हि नासताहे

रामाची आज्ञा घेऊन नवीन सैन्यासह युद्धाला आले ते.

---

१. प्रहार साई. २. पमाल्या. ३. दृडे. ४. कथ्थीले. ५. दूतांनीं. ६. कोल्हा. ७. सिंह. ८. काळ. ९. धरून आणा. १०. ग्रह वि. ११. रक्षण कर. १२. उत्तेजनपर उद्गार. १३. अग्निप्रमाणें. १४. भुरळा. १५. रावण वधाहून. १६ यज्ञकार्य.

२४ आर्या [ गीति. ]

वरवीर[1] भूरि[2] पृतना[3]वेष्टित गर्जे 'अलों अलों' भरत
पावे रणासि भौतिक-वपुहुनि[4] सत्कीर्ति-देह-लोभ-रत[5]

भरत ( कुशास ):— २५ पद [ ता. पंजाबी. ]

मुला! तुझा कोण पिता वद गा ! ध्रु०
" युद्ध कशाचें, मख-हय[6] सोडी पावसी थोर दगा[7] १
श्रीरामाचें दर्शन घेई अंतरिं तत्पद गा!" २
चूडामणि सुत, स्नेहचि उसळे उदकीं जणुं तुंदगा[8] ३

कुश ( भरतास ):— २६ श्लोक [ कामदा. ]

पहुडले रणीं दोन भाउ रे! तसिऱ्याचिही कोण भा[9] उरे?
हीच भी जणूं वाटते खरी म्हणुनि वंचिसी[10] फार वैखरी[11]

भरत ( कुशास ):— २७ श्लोक [ कामदा ]

वांचवीं अर्धीं आप्तभाउ गा! व्यर्थ गोष्टिचा सोस[12] वाउगा
आमची तुम्हा काय काळजी देह वांचवा सर्वकाळ जी !

कुश ( भरतास ):— २८ पद [ चाल-ये रे गरुडा. ]

ऐकिला राम तुझा कानीं वाणिला फारचि लोकांनीं ध्रु०
सोडिली जेव्हां निजराणी सुकीर्ति फिरत्ये ती रानीं
अकीर्तिचा धरिला पाणी[13] भासला मख लाजिरवाणी
आहे वार्ता कळली सारी सखा दा० १

२९ श्लोक [ व. ति. ]

या भाषणें उजाळिला भरताग्नि पेटे
'जाळूं' म्हणे 'तृण कुशासि लवें चपेटें'

---

१. श्रेष्ठ वीर. २. पुष्कळ. ३. सेना. ४. जडदेहाहून. ५. कीर्तिरूप देहावर प्रेम करण्यांत गुंतलेला. ६. घोडा. ७. धोका. ८. भोपळा. ९. भीति. १०. खचितोस. ११. वाणी-शब्द. १२. हाव. १३. हात, अकीर्तीसहि पाणिग्रहण केलें.

हें नेणवे, जरि कुशाप्रति पूर येतो
वांचेल कीं लव तरी निळयांसि[1] नेतो

### ३० आर्या [ गीति. ]

सबल–कर–स्थित वस्तू दुर्बल काळीं कुण्याहि हरितो का ?
कैकेयीऽभीनंदन[2] समर करी नेणुनीच हॅरि तोका[3]

### ३१ पद [ चा. अरगळ्या. ]

पहा पहा वाहिनी–केळी[4] मरुदंबुद[5] ते मुलगे
शूर मानिति हा रण नलगे धृ०
रक्त जल वाहे, नर–मांस चिखल झाला
केश ते समजा शैवाला[6]
हस्त, पद मासे, दिसे ईरळा[7] जणुं भाला
कांसवापरि वाहती ढाला
जित मधें झुकले, वृष, हय, गज, अवि[8], खुलगे[9] शू० १
बाण भरताचे, कुश वरचेवर तोडी
अंगिंच्या कवचाही फोडी
पाडिला खालीं, उरल्याचे[10] रथ मोडी
भेडरी[11] येउनि कर जोडी
चूडामणिजेशा[12], किति कींव करिती सलगें[13] शू० २

### ३२ श्लोक [ व. ति. ]

श्री राघवा! आधिं उठा मख–कर्म सारा
येऊनियां रणिं पहा पडला पसारा
हे पाडिले भरतजा अजि बालकांनीं
आल्यावरी बहु कथा अइकाल कानीं

---

१. घरास. २. भरत हा कैकेयीरूप हत्तिणीचा मुलगा. ३. बाल सिंहाशीं. ४. सैन्याचीक्रीडा. ५. वायु आणि मेघ. ६. शेवाळ. ७. कामट्या. ८. बकरा. ९. रेडे. १०. राहिलेल्यांचे. ११. भीतीनें. १२. रामाला. १३. सलगीनें.

सैनिकांनीं हें वर्तमान सांगितलें तेव्हां,

३३ श्लोक [ व- ति- ]

तारासुत, द्विविंद[1], मारुति योध[2], राजे
सुग्रीव मुख्य, उलथी करिती धरा[3] जे
ते प्राथिंतां अझिच जाउनि त्या मुलांला
जीते धरूनि अणितों, हलुंस फुलाला

रामः— ३४ पद [ ता- त्रिरट- ]

मुनिसुत हारविती भरता — सकल रविकुल शंक वाटे मजला ध्रु०
यज्ञ कशाचा अश्वचि नसतां — पडे बंधु-त्रयोत्सव पुरता १
आणा कवच तुह्मी ही त्या हो — जय हा मज सोडुनि गेला परता २
चूडामणिसुत—विभुनें कंकण — त्यजिलें शर कार्मुक, धरिली नरता ३

३५ आर्या [ गीति- ]

त्या ज्योतिरिंगणानें झांकियलें कीं विरोचना[10] कोशीं[11]
जी शेंद[12] क्षण झांकी शिखिळा[13] ती रसन—रोचना[14] कोशीं[15]

३६ श्लोक [ चामरा- ]

धांवले कपी श्रेष्ठ सत्वरी — माइना चमू युद्ध चत्त्वरीं[16]
ओळखी मनीं तात पावला — गुणनिवेदना पुत्र धांवला

३७ आर्या [ गीति- ]

राक्षस—मंडप नोहे वेगें सरसावलासि उचलाया
तूं एकला सकल कपि, ऋक्ष[17]—विसर कोंवलासि[18] उचला या

३८ पद [ ताल-दीपचंदी- ]

राम—पराक्रम मूर्त विराजे — मानिति आश्चर्य कपि रीस[19] राजे ध्रु०
पाडिली वानर-थाटीच्या थाटी — निजविलें द्विविदासि धरणीच्या पाठी

१- वानर विशेष- २- योद्धे- ३- पृथ्वी- ४- जिवंत- ५- संशय- ६- रामानें- ७- धनुष्यबाण- ८- मर्दपणा- ९- काजवा- १० सूर्या- ११- वानरा- १२- ओलें गवत- १३- मोराला- १४- रसनेंद्रियाला- १५- गोड लागण्यालें- १६ - रणांगणात- १७- अस्वलांचा संचय- १८- झिजले- ल्यांना- १९- अस्वल- २०- समुदाय-

गर्जेति राक्षस, रव थोर गाजे    मानिति० १
अंगद धांवला घेउनि वृक्षा,    तांडिला बाणानीं कर–पद–वेक्षा
सुग्रीवा बोले 'अरे अरे! उक्षा!    वालीला त्यांचि दाविला नेक्षा'
लोळविला तोहि, रण घोर माजे    मानिति० २
वायु-सुता! तुझा बळ सिंधु मोठा    नाहीं जगीं तरि कीर्तीचा तोटा
द्रोणागिरी एक उचालिला गोटा    अही मही मारिले भरुनियां वाठा
चूडामणिजेशा बहु केलिं काजें    मानिति० ३

मारुतिः —

३९ आर्या [ गीति. ]

जेणें दशास्य वधिला अमरां भयदायि आजि वांजिरतें
त्या रघुपतिची वस्तू मुनिजा! तुज काय वाह्वा! जिरतें?

कुशः —

४० पद ( चा. येरे गरुडा. )

"आधीं तूं स्वानन तरि पाही    काळवटलें लंका–दाहीं    धृ०
स्वसेव्या सांभाळुनि राहीं    इथें तो द्रोणाचल नाहीं"
उरीं शर हाणिला लवलाहीं    उडाला, वदतो 'बा! त्राहि'.
अचेतन पहुडे द्रुम भारी    सखा दासाचा० १

४१ श्लोक [ कामदा. ]

पाडिलें पुन्हां ऋषभ वानरां    मोजितो तिथें लव जित्या नरा
जांबुवंत ये चावि स्वाधरा    एक बाण त्या पाजवी धरा

१. ध्वनि. २. छातींत. ३. बैला!. ४. वरचढपणा. ५. कमीपणा. ६. लहान धोंडा. ७. राक्षस विशेष. ८. कामें. ९. रावण. १०. घोड्याच्या धन्यानें. ११. आपलें तोंड. १२. लंका जाळतांना. १३. आपल्या धन्यास. १४. वृक्ष. १५. अस्वल. १६. लव, थोड्या. १७. जिवत. १८. आपल्या ओंठांस. १९. धरणीला.

कुशः— ४२ आर्या [ गीति. ]

बांधावा जल-सेतू, वृद्धानें नीति, युक्ति बोधावी
व्यावी झोड पहाडीं, कीं उड्डानें फळेंचि शोधावीं

रामः- ४३ पद

वद बा! कोण्या गुरुचा दूत धृ०
जिंकिति जे सुर, दानव, मानव ते कपि केले भूत १
रवि--कुल--भूपा इतर टिकावे ऐसा नाहिंच पूत २
रघु--चूडामणि मान तुकावी [1]स्नेहा चढला ऊत ३

कुश ( रामास ):— ४४ आर्या [ गीति. ]

श्रीरामा! जंव [2]रामा त्यजिली, [3]कामासि सुकविलें समजा
चित्तीं स्थिरावले ते मायिक घेती न सुकवि लेश [4]मजा

४५ श्लोक [ स्रग्धरा. ]

रामा आवेश भारी कलभ[5]-युग जया धांवला कीं [6]इभारी
मारी बाणौघ सारी खवळुनि [7]पृतना ऊडत जेविं [8]घारी
युद्धाचें कारभारी 'हत! हत!' वदती, कोपली काय [8]मारी
धीराचे धैर्य [9]हारी, 'हरि हरि' रण तो नाठवे देह, नारी

४६ पद [ चा. ये रे गरुडा. ]

कुशाला लव [10]मिळला जोडी राम--सेना अगदीं झोडी धृ०
'[11]अग्नि' तें 'पर्जन्या' सोडी 'वायु' ला 'गिर्यस्त्रें' मोडी
'वज्र' 'ब्रम्हा' नें तोडी सर्वे तो 'मोहन' वरि जोडी
जाहला [12]मोहित असुरारी सखा दासाचा० १

या प्रमाणें वानर--सेनेचा मुख्य धनी--राम--मूर्छित झालेला पाहून लव व कुश

---

१. प्रेमाला २. स्त्री-सीता. ३. मदनास. ४. अ. जे चित्तीं स्थिरावले ते सुकवि मायिक मजा--लेश न घेतीं. ५. हत्ती--दोन. ६. सिंह. ७. सेना. ८. महामारी. ९. हरण करी. १०. भेटला ११. अस्त्र विशेष. १२. मूर्छित.

ग्रंथ संग्रहालय नं. ...... ता. ......

### ४७ आर्या [ गीति ]

कपिला पुच्छीं धरुनी नेती तैं मारुतीस कळ[1] शाया
ते लाजुनी सतीला, पडती होऊनियां विकळ काया

मारूतीसारख्या बलवंतास मरणोन्मुख पाहून व युद्धांत प्रत्यक्ष रामहि मूर्छित झाल्याचें वर्तमान ऐकून सीता घाबरून ह्मणत्येः—

### ४८ पद [ चा॰ मुनि बाळानें. ]

बाळा! केला त्वां अविनय मोठा पिता मारिला धंदा हा खोटा ध्रु०
माझें सौभाग्य नाशिलें हातें झालें ओखटें कर्म अहा! तें १
कैसी विपरीत काळाची वार्ता? हत्ती बुडवीते चलम्याची[3] गर्ता २
सीता--धैर्याच्या जाणूनि भेदा[4] चूडामणि जहि पावला खेदा ३

इतक्यांत वाल्मकिऋषिहि आश्रमांत आले.

### ४९ श्लोक.

वाल्मीकिनें ऐकुनियां प्रतापा तात्काळ तो पावत विप्र तापा
कीं हो मनीं मानित राम-केलि[6] वाणी स्वकीया जणुं सत्य केली

### ५० श्लोक [ मालिनी. ]

मुनिवर सहसा तो जानकी शोक हारी
रघुपति समजे तो पूर्ण माया--विहारी
सुत अणुनि पित्यातें भेटवी; सर्व तारी
अजितें--चरित ऐसें [10]श्राव्य नानावतारीं

मूर्छित झालेला राम नुकताच देहभानावर येऊं लागला तोंच वाल्मीकिनें दोन्हीमुलांसह सीतेला आणून त्यास ह्मटलें:—

---

१. विव्हळ. २. वाईट. ३. गार. ४. भगाला. ५. दुःख. ६. क्रीडा--लीला. ७. अविर्भव. ८. घडिलें. ९. नभूनें १०. ऐकण्यास योग्य.

## ५१ पद [ चा- मुनि वाळनें. ]

रामा! जाया[3] ही जानकी साची तुझी जोड कीं बहुत दिसांची धृ०
हीनें रूपासी आणिलें[3] लोकीं तुझी शक्ति ही पूर्ण विलोकीं १
पुत्र[5] अपुलाचि अवतार साचा पाहिला तूं धनी[4] शांत रसाचा २
इहीं युक्त करीं मख राही चूडामणिजासि घ्या, वीरांही[6] ३

**संपूर्ण.**

१. स्त्री. २. सगुण केलें. ३. आत्मात्रैपुत्रनामा० ४. स्वामी. ५. यांसह. ६. लव कुशांनाहि.

# * सेतुबंधन.

( कवि श्री. त्रिंबकराव दाळवेकर देशपांडे विरचित. )

१–२ साक्या.

सीता–शुद्धी करुनी आला रामदूत हनुमान
प्रेमें लोळे रामपदीं, तो देत बहू सन्मान १
आलिंगुनियां राम तयासी ऐक्यपणातें दावी.
जि[1]वाशिवाचें ऐक्य जाहलें वार्ता काय वदावी? २

रामानें विचारल्यावरून मारुतीनें सीतेचें सर्व वर्तमान–ती कोठें आहे, कशा स्थितींत आहे इ. सांगितलें.

३ आर्या [ गीति. ]

मग मिळवुनि कपि–सैन्या सुग्रीवांगद सुषेण नल आदि
सर्वहि वीर निघाले; पृथ्वी कांपे तदा तया पादीं

४–५ श्लोक [ भु. प्र. ]

पुढें चालले बंधु ते दोन वीर
तयां मागुती मारुती भक्त थोर
सवें सुग्रिवें घेतलें अंगदासी
निघे तो त्वरें, होय सेना[2]मुखेसी
[3]शरच्चंद्रमा शोभतो [4]उडुंमाजी
दुरी राहिली रोहि[5]णी [6]स्वप्रिया जी
वियोगें तिच्या लांछनें म्लान झाला
परी टाकिना तो सुधा–सिं[7]चनाला

---

*भावार्थ रामायणाच्या आधारें. १. राम आणि मारुतीचें. २. सेनापती झाला. ३. शरदृतूतील चंद्र. ४. नक्षत्रांमध्यें. ५. चंद्राची स्त्री. ६. आपली स्त्री (सीता.) ७. अमृत वर्षाव करण्याला. श्लोक ५ चा स्पष्टार्थ–शारदी पौर्णिमेला चंद्र अश्विनी नक्षत्रावर असतो. तारागण रूपी वानर–सेनेंत तो राम चंद्राप्रमाणें भासत होता. पण सीतेच्या वियोगामुळें मुखावर उदासीनता आली होती. तथापि जगावर उपकार करण्याचा धर्म त्यानें सोडला नाहीं.

ते सर्वजण कसे दिसूं लागले तर पशुं काय,

६ आर्या [ गीति ]

भासे राम विधूसा,[1] लक्ष्मण शोभे नभीं जसा क्षितिजे[2]
सुरगुरुसम[3] तो मारुति ऋक्षीं[4] कवि[5]सा कपींत तो रविज[6]

याप्रमाणें ती सारी मंडळी लंकेकडील मार्ग आक्रमण करीत करीत थेट समुद्रापर्यंत जाऊन पोंचली; तेव्हां,

७ आर्या [ गीति ]

कपि-समुहातें देखुनि लज्जित झाला सरित्पती[7] चित्तीं
वार्ता[8] ऐकुनि रावण डगमगला, पावला बहु भीति

८ श्लोक [ कामदा ]

पूर्णचंद्र तो तोषवी जनां
ताप देतसे कामुका[9] मना
चौरकर्मियां शत्रु वाटतो
रावणा तसा राम भासतो

९ श्लोक [ शिखरिणी ]

यदा भुःभुःकारें कपिगण निघायाप्रति बघे
तदा तच्छब्दांचा गगनभरिं मोठा ध्वनि[10] निघे
कपींच्या भारांनीं मनिं दचकला शेषहि तळीं[11]
रवीच्या तेजाला मलिन करि सेना-पद-धुली

१० श्लोक [ भु. प्र. ]

त्वरें पातलें सैन्य तें सिंधु-तीरीं
तया पाहुनी राम चित्तीं विचारी
कसें सैन्य हें पाविजे पैलतीरीं ?
कसा माझिया संकटा कोण वारी ?

---

१. चंद्राप्रमाणें. २. मंगळ. ३. बृहस्पती. ४. ताऱ्यांत. ५. शुक्राप्रमाणें. ६. सुग्रीव. ७. समुद्र. ८. वर्तमान. ९. कामीजन. १०. प्रतिध्वनि. ११. पाताळीं.

राम (स्वगत):— ११ श्लोक [शिखरिणी]

असे हा तो माझा कुळपतिच[1] सिंधु प्रियसखा
तरी यासी आतां शरण रिघण्याच्या करुं मखा[2]
वडीलांच्या पायीं नमन करणें धर्म गणिला

असा विचार करून समुद्राची प्रार्थना करून राम ह्मणतो :—

"कृपाळू तूं सिंधो! बनुनि ह्मणि दे वाट मजला"

याप्रमाणें त्या समुद्रतीरीं,

१२ श्लोक [शिखरिणी]

करोनी संकल्पा रघुपति बसे आसनिं तदा
विधीला जो निर्मी, मनिं धरित तो पूर्वज-पदा
धरि ध्याना तेव्हां अचल[3] मन तें ठेवुनि सदा
जगाचा जो कर्ता असुनि नियमा न त्यजि कदा

१३ श्लोक [कामदा]

दिवस तीन वे जाहले परी
जलनिधी न ये भेटिला तरी
निजमनीं तदा राम कोपला

आणि त्याच्या मनाची खात्री होऊन तो स्वगत ह्मणतो :—

शरधनूविना मानिना भला

१४ श्लोक [शिखरिणी]

मनीं कोपोनीयां रघुपति वदे तो जलदसा[4]
"असे हा माझा कीं वाडिल, शिशु[5] मी यासचि तसा
ह्मणोनी गेलों मी शरण; परि हा नष्ट दिसतो
अपात्री[6] दानानें क्रतु[7] न घडतां दोष घडतो"

---

१. सगराशीं संबंध. २. यज्ञाला. ३. स्थिर. ४. मेघासारखा. ५. मुलगा. ६. अयोग्य ठिकाणच्या. ७. यज्ञ.

राम :—

१५-१६-१७ आर्या [ गीति ]

नम्रपणें सिंधूला शरण रिघावेंच मार्ग हा उचित
परि या समयीं त्याचा विपरित परिणाम वाटतो खाचित
होतां दुर्बल मनुजें दुष्टा लीनाहि परी न यश त्यास
बलवंतहि पुरुषानें शरणचि जातां सुकीर्तिचा नाश
केवळ दुर्बल सिंधु क्षत्रिय मी तेज वाळगीं अंगीं
गेलों शरण तयाला तेणें हा मातला जसा शृंगी[1]

राम :—

१८ दिंडी

जन्म ज्याचा जाहला क्षात्रवंशीं
नम्र होतां लाभ ना कदा त्यासी
कीर्ति त्याची सर्व ही लया जाय
विजयि व्हाया तो पात्र मुळिं न होय

१९ श्लोक [ कामदा. ]

सर्व संग जो त्यागि अंतरीं तोचि बा! तया शांतिला वरी
मोक्षसाधनीं योग्य ती असे चक्रवर्तिनां लाजवीतसे

शांति धारण करणें रामाला कांहीं कठीण नव्हतें. परंतु येथें समुद्रा विषयीं रामाला वाटलें कीं,

२० श्लोक [ स्रग्धरा. ]

आहे हा नीच पापी, हृदयिं सदयता यास कांहींच नाहीं
माझ्या सैन्यास जाया सुगम[2] पथ न दे दंडल्याविण पाहीं

असा विचार करून तावडतोब,

बोलावी राम तेव्हां निज अनुज[3] सखा पाठिराखा जयाला

लक्ष्मणाला बोलावून सांगितलें कीं,

'सौमित्रा[4]! आण आतां लवकरि धनुला दंडण्या सागराला

१. बैल. २ सोपा. ३. धाकटा भाऊ. ४. लक्ष्मणा!

... ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे

२१ श्लोक [ शिखरिणी ]

" 'शठे शाठ्यं' केल्याविण गति नसे आणि मजला
शरें या दुष्टाला अटवुनि करूं मार्गचि भला "
असें बोलोनीयां झडकरि उभा क्रोध भरिं तो
जणों जाळायाला त्रिभुवन—वना वन्हि सरतो

२२ श्लोक [ भु. प्र. ]

जसा कोपला, रुद्र पीडींत कामें
तसा कोपुनी ओढिला बाण रामें
खगाच्या परी तेज दावी तदा तो
कडाडे धनू, मेघ कल्पांतिंचा तो

रामचंद्रानें धनुष्याला बाण लावतांच,

श्लोक [ शा. वि. ]

देखोनी प्रभुचा प्रताप मनिं तो भ्याला नदीचा पती
इंद्रादी सुरलोक सर्वहि भयें चित्तीं सदा कांपती
त्या रामा तइं जावया शरण तो सिंधू विचारा करी
घेवोनी सुत, बंधु पत्निसह तो आला त्वरेनें तिरीं

आपल्या परिवारांसह शरण आलेला तो समुद्र,

२४–२५ दिंड्या.

विप्ररूपा घेवोनि उभा ठेला तया पाहुनियां राम शांत झाला
कोप विप्रावरि काधिंच करूं नेणें दूर होतां, शोषीन जला बाणें
विप्र बोले रामासि 'शरण आलों तुझ्या तेजा देखुनी मनीं भ्यालों'
'विप्र-संकट मी दूर करिन जेव्हां' राम बोले, 'शोषीन जलधि तेव्हां

२६–२७–२८ आर्या [ गीति. ]

विप्र ह्मणे 'मी सागर झालों नत तुज, नको करूं घात'

---

१. जशाशीं तसें वागणें. २. बाणानें. ३. अग्नि. ४. मदन दहनाचे वेळीं शंकर कोपला. ५. सूर्याच्या. ६. सागर. ७. नम्र.

वदला राम तयाला "पूर्वींच मीं जोडिले तुला हात
निर्बल तुजला गमलों ह्मणुनी तूं मातलास दंभानें[1]
तरि दावितों तुला मी प्रताप आतांच या धनुष्यानें
हिमगिरि[2] उलथुनि पाडिन, दडपिन मेरूलही[3] पँदें[4] खालीं
जाळिन भुवनत्रय हें, बाणें तुज शोभितां नसे वाली[5]"

राम (समुद्रास) :— २९ श्लोक [ स्रग्धरा ]

प्रारंभीं नम्रतेला धरुनि तुजसि मी प्रार्थिलें जाण बापा!
तेव्हां त्वां कां न केली मजवरति दया ? कां दिलें व्यर्थ तापा?
आतां माझ्या प्रतापा उमजुनि मनिं तूं बोलसी नम्र वाणी
होसी रे! दुष्ट पापी, तुजसम नच मी पाहिला अन्य कोणी!

राम (समुद्रास) :— ३० श्लोक [ भु. प्र. ]

खरा दुष्ट पापी तसा मानभावी[6]
कशी मी क्षमा सांग तूंतें करावी ?
तुझ्या वर्तनें कीर्ति गेली लयाला
तसा डाग लागे रवीच्या कुलाला

राम (समुद्रास) :— ३१ आर्या [ गीति ]

गेल्या वस्तु परतुनी मिळवायाचा करीन मी यत्न
वदसी 'शरण' परी, मी धुतल्या विण डाग पाहिना वदन

३२ श्लोक [ कामदा ]

जोडुनी करां सिंधु बोलला
"ऐक राघवा! सांगतों तुला
नम्र मी तुझ्या पाँदपंकजा[7]
शांत होइ तूं बा! अधोक्षजा!"

---

१. अभिमानानें. २. हिमालय पर्वत. ३. पर्वत विशेष. ४. पायानें. ५. कैवारी. ६. कावेबाज. ७. चरणकमलाला.

समुद्र ( रामास ) : — ३३ श्लोक [ भु. प्र. ]

परब्रह्म तूं होसि बा ! रामराया !
कळेना सुरांना तुझी आदि माया
रवीच्या कुळीं जन्मसी मीहि जाणें
परी डाग लागे तुझ्या वर्तनानें

३४ आर्या [ गीति ]

पूर्वीं या रविवंशीं झाले नृप नळ, शिवी, हरिश्चंद्र
निर्मळ कीर्ति तयांची निर्लांछन शरदिंचा जसा चंद्र

समुद्र ( रामास ) :— ३५ श्लोक [ मंदाक्रांता ]

बारे ! रामा सति जनकजा[1] हारवीली तुवां ती
आली तेणें मुखिं मलिनता जेविं चंद्रा प्रभातीं[2]
पत्नीचा तो विरह तुजला साहवेना ह्मणोनी
रानोरानीं रडत फिरसी, सूर्यवंशी असोनी

समुद्र ( रामास ) — ३६–३७ श्लोक [ शा. वि. ]

मित्राचें कुळ शौर्य युक्त असतां झालास कां क्लीब[3] तूं ?
वाटे कीं मजलागिं आज शिबिचे वायांच गेले क्रतू[4] !
झाला याच पवित्र निर्मळ कुळीं राजा हरिश्चंद्रसा
ऐशाचें व्रत सोडुनी बससि या दर्भासनीं तूं कसा ?
या ऐशा कुळ-दूषकास बघण्या लज्जा मला वाटली
या लागीं स्थिर चित्त होउनि मनीं शांति प्रभो साधिली
आतां तूं समयास योग्यचि अशा कृत्यास आरंभिलें
त्वत्तेजा बघुनी मनीं उमजुनीं प्रेमें तुला वंदिलें

समुद्र ( रामास ) :— ३८ श्लोक [ स्रग्धरा ]

जेव्हां घेवोनि गेला दशमुख[5] खळ तो चोरुनी जानकीला
तेव्हां रामा तुवां ना भुजबल तिळही दाविलें त्या अरीला[6]

१. सीता. २. सकाळीं. ३. नपुंसक. ४. यज्ञ. ५. रावण. ६. शत्रूला.

आतां झालास योद्धा मजसम दुबळ्या पूर्वजाच्या वधाला
वाटेना या कसें हें अनुचित तुजला, लाज तैसी मनाला !

समुद्र ( रामास ):— ३९ आर्या [ गीति. ]

स्वजनाच्या घाताला कारण जो होय तो दुराचारी
अपकीर्ति होउनी जगिं पूर्वज–नेत्रास येतसे वारी

समुद्र ( रामास. ):— ४०-४१-४२ आर्या. [ गीति. ]

‘ कर्तु म कर्तु शक्ति ’ हि अंगींची मी तुझ्या पुरी जाणें
परि समयातें पाहुनि सुगमपथें योग्यतें तुला जाणें
मजवरि केले असती दशरथभूपें अनंत उपकार
सुत तूं त्याचा ह्मणुनी तुजला न करीं कधींच अपकार
टाकुनि दे तूं धनुला कथितों तुजला सुयोग्य जो पंथ
बांधी सेतू मजवरि तेणें होशिल तूं यशोवंत

समुद्र ( रामास ):— ४३ दिंडी.

वैश्वकर्मा नल बहुत कुशल आहे तया ऐसा जगिं दुजा कुणी नोहे
कथीं त्याला तूं सेतु रचायाला पृष्ठिं धरुनीं देईन साह्य त्याला

४४ आर्या [ गीति. ]

कथुनी ऐसें सागर वंदन करुनी पदीं, घरा गेला
झाला तैं शांत प्रभु सेतु रचाया त्वरें उभा ठेला

सारांश, रामचंद्रासारख्या सर्व शक्तिमान प्रभूला देखील प्रसंग पाहून **‘शठे शाठ्यं’** या नीति मार्गाचाच अवलंब करावा लागला, समुद्राला शरण आणून त्यावर सेतु बांधून पैलतीरीं जावें लागलें.

**संपूर्ण.**

---

१. पाणी. २. ओळखतों. ३. सोप्या. ४. मुलगा. ५. पाठीवर.

श्री ग्रंथ संग्रहालय ... नं. ...

# आख्यान-रत्न-माला, नांदेड.

या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातात. ह. भ. प. दासगणू महाराजांचीं हि प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतात. वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री. पृ. सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे. एक रुपया प्रवेश फी भरणारास पाउणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पु. किं. प्र. फी सह ३|. रु. अशा ग्राहकांसच मागील पुस्तकें पाउणपट किंमतींत मिळतील.

मु. नांदेड, (निजाम स्टेट.) — गणेश अनंत सराफ, (संग्राहक व प्रकाशक.)

## मालेवरील अभिप्राय.

केसरी :—( पुणें ता. ३०-१०-२३ ) यांत तीन सुरस आख्यानें आलीं आहेत. मुंबईंतील 'कीर्तन' मासिक बंद झाल्यापासून कीर्तन विषयक वाङ्मयाची भासणारी उणीव ही माला भरून काढील, असें या प्रथम पुस्तकावरून कोणासहि दिसून येईल. कीर्तनविषयक जुनें वाङ्मय जुन्या हस्तलिखित बाडांत पडून राहिलें आहे; आणि या मालेसारखे प्रयत्न झाले नाहींत तर तें नामशेष होण्याची भीति आहे. पहिल्या पुस्तकांतील आख्यानें हरिदास लोकांना उपयोगी आहेत इतकेंच नव्हे तर धार्मिक प्रवृत्तीच्या स्त्रीपुरुषांस व विद्यार्थ्यांसहि तीं बोधप्रद, वाचनीय व संग्रहणीय वाटतील असा भरंवसा आहे.

**स्वधर्म** ( पुणें ता. १-११-२३ ):—या मालेचें हें पहिलेंच पुष्प इतकें सुंदर आहे कीं, तें सदैव हृदयावर ठेवावेंसें वाटतें ····· तीनहि आख्यानें सर्वांग सुंदर आहेत पैकीं देवी अहल्याबाई हें आख्यान महाराष्ट्र संत दासगणू यांच्या लेखणींतून उतरलें आहे. दासगणूसारखे अत्यंत प्रेमळ, प्रतिभासंपन्न व भाविक संत हरिदास आपल्या महाराष्ट्रांत फार थोडे आहेत. यांच्या कीर्तनाला असंख्य लोक जमतात, येवढ्यावरूनच यांची लोकप्रियता सिद्ध होते. अहल्याबाई, या आख्यानांतील अहल्येच्या जन्मस्थानाची निसर्गाची स्थिति, तसेंच तिची लहानपणापासूनची ईश्वरनिष्ठा व श्रीमंत पेशवे यांना धिटाईनें विचारलेले मार्मिक प्रश्न व मल्हाररावांनीं आशीर्वादासंबंधीं छत्रपतींस दिलेलें सडेतोड उत्तर वगैरे कविता इतक्या उत्कृष्ट साधल्या आहेत कीं, त्या वाचीत असतांना वाचणाऱ्याच्या अंतश्चक्षुसमोर त्या त्या वेळेची स्थिति उभी राहिल्या शिवाय राहणार नाहीं. असो, दासगणू, चूडामणिसुत व रुक्मांगदसुत वगैरेसारख्या सुप्रसिद्ध हरिदासांची अप्रकाशित आख्यानें प्रकाशांत आणण्याचें काम श्री. सराफ यांनी आपल्या शिरावर घेतलें आहे. त्या कार्यांत त्यांना परमेश्वर यश देवो.

**नवाकाळ** ( मुंबई ३० आक्टोबर १९२३ ):—·········कीर्तन-संस्थेचें धार्मिक दृष्ट्या आपल्यांत फार महत्व आहे. पण कालमहात्म्यानें ही संस्था अलीकडे मागें पडूं पहात आहे. तिला वेळेवरच स्थिर करणें हें प्रत्येक कीर्तनाभिमान्याचें काम आहे. त्या दृष्टीनें हा प्रयत्न पुष्कळच यशस्वी झाला असून अशाच प्रयत्नांनीं कीर्तन-संस्थेला आपलें पूर्वीचें वैभव लाधणार आहे; या पुस्तकांतील आख्यानें भक्तिरस परिप्लुत असून त्यांचा हरिदासांना उत्कृष्ट उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं.

**चित्रमयजगत्** ( पुणें ओक्टोबर १९२३ ई. ):—कीर्तनाकरितां निरनिराळ्या आख्यानांचा संग्रह करावा या उद्देशानें हें मासिक (?) सुरू

करण्यांत आलें आहे. यांतील आख्यानें उपयुक्त आहेत.

**गोग्रास**:—( मुंबई ता. ) कीर्तन हें आबालवृद्ध स्त्री पुरुषांना धार्मिक व व्यावहारिक शिक्षण देण्याचें एक उत्कृष्ट साधन आहे. त्यांत वक्त्याचा बहुश्रुतपणा, विद्वत्ता व सद्वर्तन यांचा जंगजोड असल्यावर तर फारच बहार होते. अशा वक्त्यांना जनमनरंजन करून सोदाहरण ज्ञानोपदेश करण्यास योग्य आख्यानांची फार जरूरी असते. त्यांत आधुनिक जनतेच्या रुचिवैचित्र्याकडे लक्ष पुरवून नवनवीं आख्यानें तयार होतील तर दुधांत साखर. तसा प्रयत्न कीर्तन मासिकानें चालविला होता; पण तें अल्पायु झाल्यानें अशा प्रयत्नाची जरूर होती, ती या मालेनें अंशतः भरून निघेल असें वाटतें. या प्रथम पुष्पांत••• तीन आख्यानें असून तीं सुबोध, विविध वृत्तात्मक व रसाळ अशींच आहेत.

**लोकमित्र**:—( खानापूर ऑक्टोबर १९२३ ई. )······ पहिल्या पुस्तकांत नारदाची गादी, प्रस्तावना, मंगलाचरण, कविपरिचय, वत्सलाहरण ( चूडामणिसुत कृत ), श्री अहिल्याबाई होळकर ( दासगणूकृत ), श्री जयदेव चरित्र ( रुक्मांगदसुत कृत ) हे विषय आले आहेत. श्री साई महाराजांचे शिष्य **दासगणू** यांची कवित्वशक्ति आणि त्यांचें गोड व चटकदार काव्य वाचून आनंदांत तल्लीन होणार नाहीं असा मनुष्य विरळा. कीर्तन मासिक बंद पडल्यामुळें अशा प्रकारच्या एखाद्या साधनाची अत्यंत जरूर होती, ती उणीव अंशतः भरून काढण्याचें श्रेय श्री. सराफ यांनीं घेतल्यामुळें त्यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत. शांत मनाला विश्रांति मिळण्यासाठीं थकून भागून ज्यावेळीं आपण परमेश्वराची आठवण कराल त्यावेळीं ही माला धारण करा म्हणजे अनेक कविरत्नांच्या मनमोहक पद्यांनीं आपणांस विशेष आनंद मिळेल; इतकें सांगून व श्री पंढरीनाथाचे कृपेनें मालेचा मनोहर सुवास याहूनहि जास्त परिमळो इतकें मागणें मागूं म्हणजे झालें.

२३३



धर्मजागृतिः— ( ऑक्टोबर १९२३ इ. ) कीर्तन विषयक कविता व वाङ्मय प्रसिद्ध करावें हा या मालेचा उद्देश आहे. त्या पुस्तकांत तीन कवींचीं आख्यानें आहेत व कवि उत्तम असल्यामुळें तीं चांगलीं वठलीं आहेत.

ज्ञानप्रकाशः– ( पुणें ) नांदेड येथील रा. रा. गणेश अनंत सराफ यांनीं वरील माला सुरूं करून मुंबईच्या कीर्तन मासिकाचेंच कार्य या पुढें मालेच्या द्वारें चालविण्याची जबाबदारी शिरावर घेतल्यासारखें दिसतें. ……यांतील आख्यानें बरीं रंगविलीं आहेत. पुढचीं पुस्तकें यापेक्षांहि सुबक निघतील अशी आशा आहे …… कीर्तनसंस्थेविषयीं आस्था व अभिमान बाळगणाऱ्यांनीं मालेस जरूर आश्रय द्यावा.

निजाम विजय :—( हैद्राबाद द. ता. २०-११-२३ ई. ) या मालेच्या योगानें या प्रांतांतील गुप्तरत्नें उत्पन्न ( उघड ) केलीं जाऊन त्यांचें तेज बाहेरील लोकांस दिसेल हा अलभ्य लाभ आहे …… आरंभींच कवींचा परिचय करून देण्याची केलेली तजवीज उपयुक्त आहे. मालेनें आख्यानें पुरविण्याचें काम केल्यावर आपल्याकडे पुष्कळसे कीर्तनकार तयार होवोत असें इच्छितों.

प्रो. लक्ष्मण शास्त्री लेले ( पुणें ता. २०-१०-२३ ई. चें पत्रांत ) :— प्राचीन कीर्तनसंस्थेचा उद्धार होणें अवश्य आहे. समाजाला धार्मिक व नैतिक शिक्षण देण्याचें तें उत्तम साधन आहे. असल्या साधनाची उपेक्षा होत आहे ही खेदाची गोष्ट आहे. आख्यान-रत्न-माला हरिदासांच्या कंठांत विराजमान झाल्यास मोठेंच कार्य होणार आहे. मालेंतील रत्नें एकंदरींत उज्वल आहेत. आपल्या प्रयत्नाला यश येवो असें मी इच्छितों. क०

प्रो. श्री. नां. चापेकर ( खेड पुणें ता. ७।११।२३ च्या पत्रांत ):— आपल्या कडून 'आख्यान-रत्न-माले' चें १ लें पुस्तक आलें त्याचा मी साभार

स्वीकार करितों. पुस्तक समग्र वाचलें. आपल्या मालेचा उद्देश स्तुत्य व उत्तेजनाहि आहे. देशकालवर्तमानानुसार नव्या नव्या संस्कारास अनुरूप आधुनिक होतकरू कविवर्गाकडून नव्या धर्तीचीं वाचनीय काव्यें निर्माण होत आहेतच. परंतु, त्याच्याच बरोबर जनरूढ मराठी भाषेची खरी आणि निदर्शक महाराष्ट्रीय जनतेचा जीव कीं प्राण अशा प्राचीन संत कवींच्या प्रासादिक काव्याच्या संस्काराची, व लोकांत आध्यात्मिक, धार्मिक व नैतिक जागृति ठेवणाऱ्या पौराणिक व संतचरित्रें, वंदनीय ऐतिहासिक स्त्रीपुरुष यांच्या चरित्रवर्णनपर आख्यानात्मक कविता, हिचें हि जुने सांप्रदायीक कीर्तनकार व प्रासादिक कवि यांजकडून संरक्षण व संवर्धन होणें खऱ्या धार्मिक उन्नतीच्या व स्वभाषाभिवृद्धीच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य व श्रेयस्कर आहे. म्हणून मी आपल्या प्रयत्नाचें मनःपूर्वक अभिनंदन करितो, व माला दीर्घायुषी व उत्कर्षसंपन्न होवो असें इच्छितों. मालेच्या पहिल्या पुस्तकांतील तिन्हीं आख्यानें प्रेमळ व प्रासादिक काव्यरचनेचीं आणि साधारण जनतेचें मनोरंजन करून त्यांस उत्तम बोध देणारीं आहेत. ...

श्री. ज. र. आजगांवकर ( महाराष्ट्र कविचरित्रकर्ते बांद्रे ता. १६-१०-२३ इ. च्या पत्रांत :—आपण स्मरणपूर्वक आख्यान-रत्न-मालेची भेट पाठविली त्याबद्दल आभारी आहे. आपला प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. विशेषतः या निमित्तानें तरी, जुन्या कवींची कांहीं अप्रसिद्ध कविता छापून निघेल म्हणून मला आनंद वाटतो. प्रस्तुत पुस्तकांतलीं तिन्हीं आख्यानें सरस आहेत. हरिदासवर्गाकडून योग्य साहाय्य व उत्तेजन मिळून हें आपलें अंगीकृत सत्कार्य यशस्वी होवो असें इच्छितों. छपाई वगैरे बाह्यांगही सुरेख आहे, ...... क०

श्री. दत्तात्रेय माधवराव कुळकर्णी ( मु. तुळजापूर निजामस्टेट हे आपल्या मि. अश्विन कृ. १ शके १८४५ च्या पत्रांत ):—मोगलाईत दाखल असलेला महाराष्ट्र निबिड काळोखांत बुडून गेलेला असतांना आपण

असा प्रयत्न करण्याचें धाडस करीत आहां, याबद्दल या प्राचीन महाराष्ट्र वासियांपैकीं प्रत्येक आपलें कौतुक करील. आ. र. माला सर्वांग सुंदर आहे; व हें आदरणीय रत्न प्रत्येकानें संग्रह करण्यास योग्य असें आहे. मला आपल्याविषयीं फारच आदर वाटत आहे. महाराष्ट्र आपल्या प्रयत्नाचें चीज करील अशी आशा आहे. क०

**सद्विचार** ( बडोदें फेब्रुआरी १९२४ ) :— हल्लीं कीर्तनसंस्था नवीन कवनांचा व नवीन आख्यानांचा उपयोग करीत नसल्यानें सांचलेल्या डबक्या सारखी तिची स्थिति झाली आहे; तींत नवीन झरे सोडून जिवंतपणा आणला नाहीं तर अशीच आटून जाईल. म्हणून या रत्नमालेसारखे यत्न करणारांचें अभिनंदन करून रा. सराफ यांस हा परमार्थ प्राप्तीचा मार्ग धीरानें चोखाळण्याची विनंति करितों. या आख्यानांपैकीं अहल्याबाईचें आख्यान नामी साधलें आहे.

REFBK-0002331

REFBK-0002331

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ | ओळ | शुद्ध | पृष्ठ | ओळ | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|
| २ | टीप | शेवटचा शब्द प्रथम आला आहे. | ३० | १० | वृत्ति. |
| ११ | १३ | होत आहे हें | ३८ | १४ | ऊडते. |
| १२ | १८ | बंधूस. | ३९ | २ | माउलीस. |
| १५ | ६ | स्फूर्तो वरि. | ४६ | ९ | माझ्या. |


## मासिक ) श्री साईलीला. ( पुस्तक.

पृष्ठसंख्या ४० वार्षिक वर्गणी रु. ३—६—० ट. ह. सह.

हें मासिक गेल्या चैत्र महिन्यापासून नियमितपणें दर महिन्यास प्रसिद्ध होतें. यांत शिर्डीचे ( ब्रह्मीभूत ) श्री **साईबाबा** यांच्या लीलांचा व बोधामृताचा संग्रह गद्य व पद्यरूपानें केला जात आहे. श्री साईबाबांच्या भक्तांनीं व इतर मुमुक्षूंनीं अवश्य संग्रहीं ठेवावें.

पताः—गोविंद रघुनाथ दाभोळकर. श्रीसाईलीला कार्यालय.
५ सेंटमार्टिनरोड **वांद्रे** ( मुंबईनजीक ) बी. बी. सी. आय. रेल्वे.

## छापतआहे ) श्रीनामदेव ( नांवेंनोंदवा

### महाराजांचें काव्यमय चरित्र.

श्री संतशिरोमणी **नामदेव** महाराजांचें काव्यमय साग्र चरित्र रा. रा. **देवीदास लक्ष्मण महाजन** नांदेड, ह्यांनीं लिहिलें आहे.

त्या चरित्राचे तीन खंड असून पूर्व खंडांत, नामदेवाचें देवास दूध पाजविणें, व कीर्तनांत मेलेली गाय उठविणें; मध्य खंडांत, नामदेवाच्या कीर्तनांत गोरोबा कुंभारास हात फुटणें, व औंढ्या नागनाथाचे देवळांत सर्वत्र शिवलिंगें पाहून विसोबाखेचरास गुरु करणें; आणि उत्तर खंडांत परिसा-भागवतास कृतार्थ करणें व औंढ्यानागनाथाचें देवालय कीर्तनप्रसंगीं फिरविणें; इत्यादि विषय आहेत. चरित्र फारच रसाळ व प्रासादिक असून ह. भ. प. श्रीसंत **दासगणू** महाराज ह्यांनींहि त्याची शिफारस केली आहे. आम्ही तें चरित्र छापवून प्रसिद्ध करीत आहोत. प्रति फारच नियमित निघणार असल्यामुळें आगाऊ नांवें नोंदविणारांसच पुस्तक मिळण्याचा संभव आहे. करितां खालील पत्त्यावर त्वरित नांवें नोंदवावींत.

**विठ्ठल लक्ष्मण सुबंध प्रोप्रायटर, "नामदेव प्रेस."** शिंपी आळी,
११७० मेनस्ट्रीट **पुणे—लष्कर.**